बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | रविवार,दि.२७ एप्रिल २०२५ | वर्षे४थे | अंक२५५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३


# ज्या तुरुंगात वाल्मिक कराड, तिथला धक्कादायक प्रकार!

**दोन अधिकाऱ्यांचे तडकाफडकी निलंबन!** ▸ **रक्ताचे नातेवाईक म्हणून भलतेच कैद्याला भेटून गेले** ▸ **कारागृहात आढळून आल्या अनेक त्रुट्या** ▸ **महासंचालक कार्यालयाकडून बीड कारागृहाची तपासणी**

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. हे प्रकरण नंतर चांगलेच गाजले. या हत्येनंतर बीडमधील गुंडाराजचे एकापेक्षा एक धक्कादायक अशी प्रकरणं समोर आली. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड हा प्रमुख आरोपी असून सध्या तो बीडच्या तुरुंगात आहे. दरम्यान, तो ज्या तुरुंगात आहे, त्याच तुरुंगाबाबत एक मोठी माहिती समोर येत आहे. कराड असलेल्या कारागृहातील वरिष्ठ तुरूंग अधिकाऱ्याला आणि एका महिला शिपायाला निलंबित करण्यात आलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार वाल्मिक कराड ज्या तुरुंगात आहे, त्याच तुरुंगाचे वरिष्ठ अधिकारी डी. डी. कवाळे आणि महिला शिपाई सीमा गोरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे ही कारवाई करत असताना त्यांच्यावर मोठा ठपका ठेवण्यात आला आहे. रक्ताच्या नातेवाईकांव्यतिरिक्त इतर लोकांना कैद्यांना भेटू दिल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.



### तपासणीत धक्कादायक सत्य आलं समोर

तसेच कारागृहात अनेक त्रुट्या आढळून आल्यानेही ही कारवाई करण्यात आली आहे. कवाळे नामक अधिकाऱ्यांकडे दीड महिन्यांपूर्वी बीड कारागृहाचा तात्पुरता पदभार देण्यात आला होता. यादरम्यान कारागृह महासंचालक कार्यालयातील एका पथकाने बीड कारागृहाची तपासणी केली होती. या तपासणीदरम्यान अनेक त्रुट्या आढळून आल्या होत्या. त्यामुळेच पुणे येथील अपर पोलीस महासंचालकांना ही मोठी कारवाई केली आहे.

### तो कैदी नेमका कोण?

गेल्या काही दिवसांपासून याच कारागृहात असलेल्या वाल्मिक कराडला स्पेशल ट्रीटमेंट दिली जात होती, असा वारंवार आरोप होत होता. एकीकडे हा आरोप होत असतानाच या तुरुंगातील एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचे आणि महिला शिपायाचे निलंबन करण्यात आले आहे. त्यामुळे नातेवाईकांव्यतिरिक्त इतर लोकांना भेटू दिलेला 'तो' कैदी नेमका कोण? आहे, याबाबत विचारले जात आहे. गेल्या अनेक वर्षापासून कारागृहातील अधिकाऱ्यांचे निलंबन झालेले नाही. असे असताना बीडच्या तुरुंगाबाबत करण्यात आलेल्या कारवाईला चांगलेच महत्त्व प्राप्त झालेले आहे.

### सुरेश धस यांनी केली मोठी मागणी

गेल्या अनेक दिवसांपासून भाजपाचे आमदार सुरेश धस यांच्याकडून संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना वेगवेगळ्या तुरुंगांत ठेवावं अशी मागणी केली जात आहे. बीडच्या तुरुंग प्रशासनाबाबत अनेक तक्रारी निश्चितच आहेत. याबाबतचे काही पुरावे हाती येत आहेत. त्यानंतर आम्ही पुराव्यासहित तक्रार करू, असं सुरेश धस यांनी म्हटलंय. तसेच संतोष देशमुख यांच्या खून्यांना एका जागेवर ठेवू नये ही मागणी आम्ही करणार आहोत, असंही त्यांनी सांगितलंय. त्यामुळे आता तुरुंग अधिकाऱ्यांचे निलंबन झाल्यामुळे आगामी काळात नेमकं काय होणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

# कन्हेरवाडी प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग

**दिलासा:राजेभाऊ फडांच्या भगीरथ प्रयत्नांना यश!**



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या भगीरथ प्रयत्नांना अखेर यश आले असून, आज शनिवार, दिनांक २६ एप्रिल रोजी कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. यावेळी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी बोलत असताना राजेभाऊ फड म्हणाले की, जनतेच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आम्ही नेहमीच तत्पर आहोत. माझ्यावर प्रेम करणाऱ्या मायबाप जनतेच्या सदैव सेवेत राहण्यात मला समाधान असून, यापुढेही लोकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहोत. यावेळी कन्हेरवाडी येथील जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेचाही आढावा त्यांनी घेतला.

### कन्हेरवाडी पाणीपुरवठा योजनेचा आढावा


कन्हेरवाडी गावातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना उभारण्यात आली असून, याचे काम पूर्णत्वास आले आहे. यावेळी या योजनेच्या कामाचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी आढावा घेऊन संबंधितांना आवश्यक त्या सूचना केल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडावे यासाठी शासन आणि प्रशासनाकडे मागील महिनाभरापासून पाठपुरावा केला. पाणी न सोडल्यास वेळप्रसंगी रस्त्यावरचा संघर्ष करू असा इशारा दिला होता. जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय मुख्याभियंत यांच्या तांत्रिक मान्यतेनंतर आज अखेर या जलाशयातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. यामुळे आता कन्हेरवाडी, जिरेवाडी, जलालपूर, ब्रह्मवाडी, समता नगर, बँक कॉलनी, शंकर पार्वती नगर आदी भागातील जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या हस्ते व्हॉलचे चाक फिरवून कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात आले. यावेळी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाइस चेअरमन मिनिनाथ दादा फड, ज्येष्ठ नेते एच.यू. फड, » पान २ वर

# पोलीसावंर हल्ला करणाऱ्या युवकांवर गुन्हा

**बोंबला:सिरसाळ्यात भर रस्त्यावर केली होती मारहाण**

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी : भांडणे रोखणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावंर हल्ला करून मारहाण करणाऱ्या सोहेल आक्रम खॉन पठाण या सह इतर तिघांविरुद्ध सिरसाळा पोलीस स्टेशन मध्ये पोलीस कर्मचारी

विश्वजीत विश्वांभर देवकते यांच्या फिर्यादीवरून अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भर चौकात एका शिक्षकाला मारहाण करतांना पोलीस देवकते भांडणे रोखण्याच्या उद्देशाने तिथे गेले असता शिक्षकाला मारहाण करणाऱ्या सोहेल पठाण ने थेट ह्या पोलीस कर्मचाऱ्यावरच हल्ला चढवला होता .या प्रकरणी पोलिस देवकते यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सविस्तर वृत्त असे कि, विश्वजित देवकते व सहकारी राठोड दोघे आठवडी बाजारामध्ये पेट्रोलिंग करण्यासाठी जात होते. दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाच्या जवळ पंढरी हॉटेल समोर रोडवर यांना काही लोक जमलेले दिसले तेव्हां सिरसाळा येथील साहिल अक्रम खॉन पठाण व इतर तीन अनोळखी यांनी एका इसमास पकडून » पान २ वर

# बीडमध्ये महिला वकिलास मारहाण

**कारवाई: पतीविरोधात गुन्हा दाखल**

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड: एका महिला वकिलास तिच्या पतीने शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना शिरूर पोलिस ठाण्यात गुरुवारी दुपारी घडली. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात पती विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.रविकिरण विष्णू सानप असे त्या आरोपीचे नाव आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी येथील ड. शीतल यांचा विवाह शिरूर कासार तालुक्यातील तागडगाव येथील रविकिरण विष्णू सानप याच्यासोबत २०२१ मध्ये झाला होता. लग्नाच्या एक वर्षानंतर सासू व तीन नणंदा शीतल यांना शारीरिक व मानसिक त्रास देत होते. पती रविकिरण हा दारू पिऊन मारहाण करीत होता. त्यामुळे शीतल यांनी १८ सप्टेंबर २०२४ रोजी गडचिरोली पोलिस अधीक्षकांकडे » पान २ वर

# निरगुडीत साकारतेय संत सावता महाराज मंदिर

**भूमिपूजन सोहळा उत्साहात: गुणवंत भूमिपुत्रांचा सन्मान**

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड: पाटोदा तालुक्यातील निरगुडी येथे शनिवारी (दि.२६) संत शिरोमणी सावता महाराज मंदिराचे भूमिपूजन व गुणवंत भूमिपुत्रांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. संत सावता महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर स्व.लक्ष्मण उर्फ छान महाराज शेलार यांना सामूहिक आदरांजली अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. निरगुडीत संत सावता महाराजांचे मंदिर साकारत असल्याने वारकरी संप्रदायाकडून ग्रामस्थांचे कौतुक करण्यात आले.

संत शिरोमणी सावता महाराजांचे वंशज ह.भ.प. सावता महाराज वसेकर आणि ह.भ.प. रविकांत महाराज वसेकर यांच्या हस्ते मंदिर भूमिपूजनाचा विधी पार पडला. » पान २ वर

### रुक्मिण सानप यांच्यासह गुणवंतांचा सन्मान

या सोहळ्यात मंदिरासाठी जमीन दान करणाऱ्या रुक्मिण सानप यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच नवनियुक्त पोलिस उपनिरीक्षक बिभीषण बेदरे, राजेश निर्मळ, डॉ.यश राऊत (एमबीबीएस), जलसंपदा विभागातील अविनाश महानोर, तेजस्विनी घुमरे, शिक्षक अशोक शेलार, पोलिस कॉन्स्टेबल संतोष बजगुडे, रोहित शिंदे आणि गावातील प्रथम महिला पोलिस ज्योती जाधव यांचा सन्मान करण्यात आला.

**दिलासा** | **बाजीराव चव्हाणांच्या हस्ते मदत सुपूर्द**

# उपमुख्यमंत्री एकनाथ मदतीला धावले!

पुण्यभूमी प्रतिनिधी



पहेलगाम : राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या सूचनेनुसार पेहलगाम हल्ल्यात शहीद झालेले आदिल हुसेन शहा यांच्या कुटुंबियांना मदत करण्यासाठी उपमुख्यमंत्री कार्यालयातील काही अधिकारी आणि युवासेनेचे निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी अनंतनाग जिल्ह्यातील हापतनाड गावात शहीद आदिल हुसेन शहा यांच्या कुटुंबियांचं सांत्वन करण्यासाठी भेट घेतली. तेव्हा शिवसेनेकडून या कुटुंबीयांना तात्काळ ५ लाख रुपयांची रोख रक्कम तात्काळ आर्थिक मदत म्हणून देण्यात आली. त्याचबरोबर आदिल हुसेन यांचं जीर्ण अवस्थेतील घर बांधून देण्याची जबाबदारी ही राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी घेतली आहे. तसेच शहीद आदिल हुसेन शहा यांच्या घराचे बांधकाम करण्याची जबाबदारी युवासेनेचे तडफदार वेक्तिमहत्व असलेले युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्यावर सोपवली आहे. अनंतनाग जिल्ह्यातील हापतनाड गावात शहीद आदिल हुसेन शहा यांच्या कुटुंबियांचं सांत्वन करण्यासाठी शिवसेना, यूवासेनेचे बाजीराव चव्हाण व काही पदाधिकारी तेथे पोहचले असता. तेव्हा त्यांनी शिवसेनेकडून या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची तात्काळ आर्थिक मदत सपूर्द केली.

त्यावेळी हापतनाड येथे पत्रकारांनी या भेटी बद्दल युवासेनेचे बाजीराव चव्हाण यांना या भेटीबद्दल काही प्रश्न विचारले असता. त्यावेळी पत्रकार यांच्याशी बोलतांना बाजीराव चव्हाण यांनी सांगितले की, पेहलगाम येथील निष्पाप पर्यटकावरील हल्ला हा एक भ्याड हल्ला असून आम्ही याचा निषेध करतो. आणि निष्पाप पर्यटकांनी आपले प्राण गमावले ते शहीद झाले त्यांना आदरांजिल वाहतो. याचा भारतीय सेना लवकरच नक्कीच बदला घेऊन सडेतोड उत्तर देईलच. पन अनंतनाग जिल्ह्यातील हापतनाड गावातील शहीद आदिल हुसेन शहा यांनी आपल्या जीवाची कुठलीही पर्वा न करता. पर्यटकांची कुठलीही जात- पात न पाहता. त्यांना त्यावेळी दहशतवाद्यांच्या तावडीतून वाचवण्याचा प्रयत्न केला. व अनेक पर्यटकांचे त्यांनी प्राण वाचून ते स्वतः त्याठिकाणी शहीद झाले. आश्या भारत वासियांचा आम्हाला अभिमान वाटतो. आज » पान २ वर

# वाल्मिक कराडला पॅनिक अटॅक

**चर्चेतले:बीड जिल्हा रुग्णालयात उपचार्थ हलविले**

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मिक कराडची प्रकृती सध्या बिघडली आहे. शनिवारी दुपारी बोलण्यास व श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने शनिवारी दुपारी बीड जिल्हा कारागृहात वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. या पॅनिट अटॅकमुळे तपासणी करणाऱ्या डॉक्टरांनी सिटीस्कॅन करण्याचा तसेच रक्त चाचणीचाही सल्ला दिला होता. त्यानुसार रात्री बीडच्या जिल्हा रुग्णालयात वाल्मिक कराडची सिटीस्कॅन तपासणी करण्यात आली आहे. या तपासणीचा अहवाल रात्री उशिरा येणार असून यानंतरच पुढील उपचाराची दिशा ठरणार असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

वृत्तानुसार, आरोपी वाल्मिक कराडची आज अचानक प्रकृती बिघडली. दुपारच्या सुमारास त्याला अचानक पॅनिट अटॅक आला. जेल प्रशासनाने तातडीने डॉक्टरांना बोलावून घेतले. तपासणीदरम्यान डॉक्टरांनी त्याच्या रक्त चाचण्या करण्याचा सल्ला दिला. वाल्मिक कराडच्या » पान २ वर

## हिशोब चुकता करणार

काश्मीरमधील पहलगाम येथील बैसरनमध्ये दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर केलेल्या हल्ल्याने भारताच्या सर्वो च्च स्थानी असलेल्या जम्मूपासून ते तळाशी असलेल्या कन्याकुमारीपर्यंत असणाऱ्या प्रत्येक भारतीयांकडून संताप व्यक्त केला जात आहे. या हल्ल्याला उत्तर देण्यासाठी भारतीयांच्या हाताच्या मुठी आवळल्या जात आहेत. प्रत्येक भारतीयांच्या मनामध्ये या हल्ल्याप्रती सूडाची भावना जागरुक झाली असून पाकिस्तानी दहशतवादाला ठेचून काढण्याची भाषा उघडपणे बोलली जाऊ लागली आहे. भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेला हल्ला हा धर्म विचारून झाला आहे. दहशतवाद्यांनी पंतप्रधान मोदींचे नाव घेत, त्यांना निरोप द्या, असे सांगत निर्ढावल्याप्रमाणे भारतीय भूमीवर गोळीबार केला आहे. भारताच्या विरोधात भारताच्या भूमीवर येऊन केलेला बेछूट गोळीबार हे भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला दिलेले एक प्रकारचे आव्हान आहे. या पर्यटकांमध्ये मृत्युमुखी पडलेले काही पर्यटक, तर नवीन विवाह झालेले असून भारताच्या स्वर्गभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीरमध्ये हनीमूनसाठी गेले होते. आपला मुलगा नवसंसाराची सुरुवात करण्यासाठी काश्मीरला जातो काय आणि दहशतवादी हल्ला करून त्याचे पार्थिव घरी येते काय, जी नववधू घरातून गेली होती, तीच नववधू विधवा बनून घरात परतते काय, हा सर्वच संतापजनक प्रकार आहे. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स हे चारदिवसीय भारत दौऱ्यावर आले होते, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर गेले होते. हे सर्व पूर्वनियोजित होते. अचानक घडलेले नाही. जाणीवपूर्वक घडवून आणले गेले आहे. अर्थात त्यासाठी पूर्वतयारीही जोरदार करण्यात आली होती. हा हल्ला पाकिस्ताननेच घडवून आणला आहे, हे उजेडात आले आहे. सरकारने लवकरात लवकर कारवाई करून या घटनेचा बदला घ्यावा, यासाठी केंद्र सरकारवरही भारतीयांचा दबाव वाढत चालला आहे. भारत सरकारनेदेखील त्यादृष्टीने पाऊले उचलण्यास सुरुवात केली असल्याने पाकिस्तानला नजीकच्या काळात पहलगाम हल्ल्याची जबरी किंमत मोजावी लागणार असल्याचे संकेत विविध घडामोडींतून व बैठकांतून प्राप्त होऊ लागले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तत्काळ पहलगामकडे धाव घेत मृतांच्या व जखमींच्या नातेवाईकांची भेट घेतली. तेथील सुरक्षा यंत्रणांकडून घडल्या प्रकाराची माहिती घेतली.

पंतप्रधान मोदी हे जरी त्यावेळी सौदी अरेबियात असले तरी त्यांनी अमित शहा यांना निर्देश देत तपशीलवार आढावा जाणून घेतला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही लष्कराच्या तीनही दलांची बैठक घेऊन कोणत्याही क्षणी काही घडण्याची शक्यता लक्षात घेऊन तीनही दलांना अलर्ट राहण्याचे निर्दे श दिले. पंतप्रधान मोदी आपला सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट टाकून भारतात परतले. भारतात परतताना त्यांनी पाकिस्तानी हद्दीचा वापर न करता पाकिस्तानला सूचक इशारा देण्याचे कार्यही कृतीतून केले आहे. पंतप्रधानांनी भारतात येत तातडीची बैठक घेतली. लष्कर आणि संबंधित विभागाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून पंतप्रधानांना यावेळी पूर्ण ब्रिफिंग करण्यात आले. त्यानंतर, अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. परराष्ट्र खात्याने पत्रकार परिषद घेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयावर माहिती दिली. त्यानुसार, पाकिस्तानविरोधात ५ मोठे निर्णय घेत ५ तगडे धक्के पाकिस्तानला देण्यात आले आहेत. पाकिस्तानच्या दिल्ली दूतावासातील कर्मचाऱ्यांची कपात करण्यास सांगताना पुढील ४८ तासांत पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सिंधू जल करारावर स्थगिती देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला असून वाघा बॉर्डर १ मेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. पाकिस्तानी नागरिकांना मंजूर केलेला भारतातील व्हिसा रद्द करण्यात येत आहे, तसेच भारतातील पाकिस्तान दुतावासाच्या आनुषंगाने देखील महत्त्वाचा निर्णय या बैठकीत झाला आहे. दरम्यान, पाकिस्तानची व्यापाराच्या दृष्टीने कोंडी करण्याची रणनीती भारताने आखली असून आजच्या बैठकीतील निर्णयाचा दूरगामी परिणाम भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांवर होणार आहे. पाकिस्तानला धडा शिकविण्याची मागणी भारतवासीयांकडून करण्यात येत आहे. घडलेली घटना भारतासाठी क्लेषदायी असून अमेरिकेचे उपाध्यक्ष भारतात असताना हा हल्ला घडवून भारतात आलबेल नसल्याचे पाकिस्तानने दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. दहशतवाद ठेचून काढला जाईल, दहशतवादाला माफी नसल्याचा इशारा भारताने दिला आहे. भारतानेही पाकिस्तानचा हिशोब कायमचाच चुकता करावा, पुन्हा असे करण्याचे धाडस पाकिस्तानचे होता कामा नये, असा सूर भारतीयांकडून उघडपणे आळविला जात आहे. देशाच्या शत्रूंनी केवळ निष्पाप पर्यटकांवर नव्हे, तर भारताच्या आत्म्यावरच हल्ला करण्याचे धाडस केले आहे. दहशतवाद्यांच्या हाती उरलेली थोडी-फार जमीनसुद्धा आता हिरावून घेण्याची वेळ आली आहे.आज बिहारच्या भूमीवरून मी संपूर्ण जगाला सांगतो की, भारत प्रत्येक दहशतवाद्याला आणि त्यांच्या समर्थकांची ओळख पटवेल, त्यांना शोधून काढेल आणि शिक्षा देईल. आपण त्यांचा पृथ्वीच्या टोकापर्यंत पाठलाग करू. आपण त्यांचा शेवटपर्यंत पाठलाग करू. दहशतवादामुळे भारतीयत्वाचे स्पिरीट कधीही कमी होणार नाही. दहशतवादाला माफ केले जाणार नाही. पहलगाम येथे पर्यटकांवर गोळीबार करणाऱ्या दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थकांची ओळख पटवू, त्यांना शोधून काढू आणि त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी शिक्षा त्यांना देऊ, असा वज्रनिर्धार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बोलून दाखवला. हल्ला करणारे दहशतवादी आणि याचा कट रचणारे त्यांच्या कल्पनेपलीकडे जाऊन शिक्षा भोगतील. देशाच्या शत्रूंनी भारतीयत्वाच्या स्पिरीटवर हल्ला करण्याचे धाडस केले आहे, असे सांगत भारत लवकरच या घटनेचा हिशोब चुकता करणार असल्याचे संकेत पंतप्रधान मोदी यांनी दिले आहे. २६/११ची घटना असो अथवा पुलवामा हत्याकांड असो, तसेच परवाचा पहलगामचा गोळीबार असो, पाकिस्तान कुरापती काढतच आहे. १९४७ पासून आपण पाकिस्तानाचे उद्योग, कुरापती सहन करत आहोत, पण आता याचा सोक्षमोक्ष लागलाच पाहिजे. पाकिस्तानला धडा शिकविण्याची हीच योग्य वेळ आहे. आता जर कच खाल्ली तर पुन्हा ये रे माझ्या मागल्या प्रमाणे पाकिस्तान नव्याने पुन्हा दहशतवादी कृत्य करेल.

# बाभळगावात रंगला सोंगाचा कार्यक्रम

## परंपरा:जंगी कुस्त्याने यात्रेची सांगता !





पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील बाभळगाव येथील मेसाई देवीची यात्रा शांततेत पार पडली यात्रेनिमित्त भव्य सोंगे व जंगी कुस्त्यांचे आयोजन यात्रा कमिटीने केले होते.मेसाई देवीच्या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे सोंगे होय.धाराशिव जिल्ह्यातील बोलकी सोंगे काढणारे एकमेव बाभळगाव येथील कलाकारांनी सोंगाची परंपरा जपली असुन प्रत्येक वर्षी कलाकार मोठ्या उत्साहात सोंगे साजरी करतात.रामायण कथेवर आधारित सोंगे नटवली जातात. रावणाचे सोंग करणारे कलाकार ८१ वर्षाचे आहेत.स्वत: रावणाचे मुखवटे तयार केले असून प्रत्येक वर्षी शिष्टाचार रावणाचे सोंग दत्तू जयवंत वाघमारे साकारतात.हत्तीवर बसलेले राजा -इश्वर रामकिसन वाघमारे (वय १६ वर्ष) राणी - अशोक गणपती वाघमारे अंगदाचे सोंग ,श्रीकांत महादेव वाघमारे दशानंद रावण,नारायण बब्रुवान वाघमारे,नवनाथ जमाले,अमोल गोरख वाघमारे,राम लक्ष्मण ,अण्णा भारत वाघमारे,सदाशिव तुळशीराम वाघमारे, वैभव अंकुश वाघमारे, डिगांबर बिभीषण वाघमारे. कंस -मधुकर नवनाथ वाघमारे,च्यानुर - राजन चंद्रकांत वाघमारे,मुस्टिक- चंद्रकांत परशराम वाघमारे,कृष्णा बलराम- बिभीषण निवृत्ती वाघमारे, प्रदीप श्रीधर वाघमारे बाळासुर -लक्ष्मण चौधरी ,भस्मासुर - विश्वनाथ जमाले,तारकासुर- रामहारी बेडके, महादेव- भागवत वाघमारे वय ७१ वर्ष, मनक्याचा आजार आहे.पुर्ण शरिर थरथरते तरीही महादेवाचे सोंग साकारले आहे.कौरव- शिवाजी भातलवंडे, भारत चौधरी, हनुमंत करडे, तेजस चांगदेव वाघमारे,पांडव- विलास शिंदे ,अभिमान सावंत, अण्णा बाळासाहेब वाघमारे, शिवाजी चत्रभूज वाघमारे, अमोल बिभीषन वाघमारे. म्हातापाची गाडी- मल्हारी कांबळे, बाबुराव कांबळे, उत्तम वैजनाथ वाघमारे, महादेव अंगरखे. अदी कलाकारांनी सोंगात सहभागी होऊन सोंगाची परंपरा जपली आहे

> रावण साकारणारे दत्तु नाना वाघमारे हे सर्वात जेष्ठ ८१ वर्षीय कलाकार आहेत. सोंगाची सुरवात कधी पासुन झाली याची माहिती नसुन ते स्वत: बालपणापासुन सोंगं पाहतात. वयाच्या २० वर्षांपासून पासुन आजतागायत ५० वेळा रावण साकारला. ४ महिण्यापुर्वी आर्धांगवायुचा झटका येऊन गेलेला तरी ताकतीने रावण साकारला.
>
> -दत्तू जयवंत वाघमारे,कलाकार

### यात्रेनिमित्त भव्य जग्गी कुस्त्यांचा फड रंगला

सोंगाचा कार्यक्रम संपल्यावर दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी येडशी, तेरखेडा,दहिफळ,सापनाई,वैराग, देवळाली येथील मल्लांनी सहभाग घेतला.तसेच महिला मल्लांनी खास उपस्थित राहून कुस्ती केली.जवळपास तीन तास कुस्त्यांचा खेळ चालला.निकाली कुस्ती देवळाली येथील हनुमंत तौर यांनी जिंकली.यात्रा शांततेत पार पाडण्यासाठी कमिटीचे अध्यक्ष हनुमंत टेकाळे, विशाल वाघमारे, पांडुरंग वाघमारे, कमलाकर वाघमारे, रत्नदीप वाघमारे, दत्ता वाघमारे, राजेश वाघमारे,आसराम वाघमारे,केशव वाघमारे,डिंगाबर कोल्हे, शिवाजी चौगुले, हरिभाऊ वाघमारे, कृष्णा वाघमारे,राहूल वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

### बैलगातून आजही सोंगांची मिरवणूक काढली जाते

बारा बैलगाड्या जुंपली जातात.तसेच जुन्या काळात लाईट नव्हती म्हणून टेंबे पेटवून त्या उजाडात सोंगे गावातून मिरवली जात होती. बैलगाडी व टेंबे आज ही सोंग मिरवणूक काढताना दिसतात तसेच श्री ग्रामदैवत मेसाई देवी यात्रेनिमित्त भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले या रक्तदान शिबिराचे रक्त संकलन श्री भगवंत रक्तपेढी बार्शी यांच्या सहकार्याने करण्यात आले. ७७ रक्तदात्यांनी या रक्तदान शिबिरात सहभाग घेतला. श्री भगवंत रक्तपेढी बार्शी चे संचालक गणेश जगदाळे विजय तोडकरी राधिका बेले पुनम वीर साक्षी वाडकर यांनी रक्त संकलन केले.

## पान एक वरून

**कन्हेरवाडी प्रकल्पातून**

रामहरी भाऊ फड, संजय मुंडे, प्रल्हाद गित्ते, प्रशांत रोडे, प्रकाशदादा फड, बाबासाहेब मुंडे, महादेव मामा मुंडे, श्रीकृष्ण फड, बाबासाहेब फड, मधुकर मुंडे टेलर, वसंत तात्या मुंडे, हरिदास गित्ते, समाधान मुंडे, महेश मुंडे, प्रदीप मुंडे, ऋषिकेश फड यांच्यासह पाटबंधारे विभागाचे चित्ताडे, विडेकर यांच्यासह अनेकांची मोठ्या संख्येने उपस्थितीत होती.

**निरगुडीत साकारतेय संत सावता**

यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. मकरंद महाराज शास्त्री, ह.भ.प. रामदास महाराज भारती, ह.भ.प. शिवाजी महाराज येवले, ह.भ.प. भक्तिदास महाराज शिंदे, ह.भ.प. पांडुरंग महाराज कराड, ह.भ.प. भगवान महाराज लिंबारुईकर, ह.भ.प. लक्ष्मण महाराज फड, ह.भ.प. नामदेव महाराज जगदाळे, ह.भ.प. भगवान महाराज बारगजे, ह.भ.प. प्रेम महाराज जगदाळे यांच्यासह अनेक वारकरी संप्रदायातील मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमास राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये राज्यमंत्री दर्जाचे राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ड. सुभाष राऊत, सागर सुरेश धस, अजय भीमराव धोंडे, ड. सतीश शिंदे, रविराज बडे, पांडुरंग नागरगोजे, संजय तुपे, आजिनाथ गवळी, शुभम खाडे, रामेश्वर गोरे, अविनाश उगले, सावता काळे, शिवाजी शेलार, सुनील शेलार आदींचा समावेश होता. हा कार्यक्रम हनुमान शेलार, ह.भ.प. प्रवीण महाराज शेलार तसेच ग्रामस्थांच्या संयोजनातून यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी निरगुडीसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**बीडमध्ये महिला वकिलास**

तक्रार अर्ज दाखल केला होता. सदरील अर्जाच्या सुनावणीसाठी शीतल यांची पती रविकिरण व सासरचे कोणीच हजर राहिले नाहीत. गडचिरोली येथील भरोसा सेल यांनी २५ जानेवारी २०२५ रोजी पुढील कारवाई करीता पत्र दिले. त्यामुळे ८ फेब्रुवारी २०२५ आरमोरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. आरोपी रविकिरण सानप हा व्यवसायाने वकील असल्याचे समजते.आरमोरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्ह्याच्या अनुषंगाने गुन्ह्याचा पंचनामा करण्यासाठी तपासी अंमलदार पोलिस निरीक्षक कैलास गवते यांनी शीतल सानप यांना शिरूर येथील सासरच्या राहत्या घरी शेळके बिल्डिंग हॉल येथे बोलावले होते. त्यानुसार त्या तिथे गेल्या असता रविकिरण सानप हा पोलिसांसमोरच शीतल यांच्या अंगावर धावून गेला, हिचे हात-पाय तोडणार, हिचे खानदान संपवणार आहे, अशी धमकी दिली. आष्टी येथे मीच खोटा गुन्हा दाखल केला आहे, त्यात तुझा बाप व भाऊ कसा फसवला आहे असे म्हणत अश्लील भाषेत शिव्या दिल्या. त्यावेळी आरमोरी ठाण्याचे पोलिस निरीक्षक कैलास गवते, रणजित पिल्लेवान, कुंदा व प्रधान हंसराज धस हे पंच उपस्थित होते. पोनि गवते यांनी शीतल यांना शांत बसण्यास सांगितले. पंचनामा झाल्यानंतर उपस्थित पोलिस, दशरथ वनवे व फिर्यादी शीतल सानप या शिरूर ठाण्यात गेल्या असता रविकिरण सानप हा तेथे आला. पोलिसांसमोर शिव्या देऊन कोण पंच आले होते, कोण स्टेटमेंट देतो असे म्हणत शीतल यांना हात-तोंडावर चापटांनी मारहाण केली, तसेच शीतल यांचे काका दशरथ वनवे यांना शिवीगाळ करून त्यांच्याही अंगावर धावून गेला. त्यावेळी उपस्थित पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्याला पकडले. शिरूर पोलिस ठाण्याचे पोलिस अशोक सोनवणे, बावनकर व इतर पोलिस अधिकाऱ्यांनी रविकिरण यास हाताला धरून बाहेर काढले तरी तुझ्या भावाचे तुकडे करणार असल्याची धमकी दिली. याप्रकरणी रविकिरण विष्णू सानप याच्या विरुद्ध शिरूर कासार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

**पोलीसावर हल्ला करणाऱ्या**

मारहाण करीत असल्याचे दिसले.म्हणुन देवकते व राठोड त्यांना म्हणाले कि,आम्ही पोलीस आहेत, तुम्ही पोलीस स्टेशनला चला, असे म्हणताच साहिल आक्रम खॉन पठाण म्हणाला कि, तु पोलीस आहेस का तुला तर मी सोडनार नाही असे म्हणून त्याच्या हातातील धारधार कटरने पोलीस देवकते यांना जखमी करण्याच्या उद्देशाने गळ्यावर ब्लेडसारख्या धारधार कटरने वार केला. तेव्हा देवकते यांनी स्वताला वाचवण्यासाठी तो वार उजवा हातावर घेतला,इतर तिघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. त्यामध्ये फिर्यादी पोलीस देवकते यांच्या उजव्या हाताला दुखापत झाली. दरम्यान सपोनि दहिफळे यांना फोन करुन घडलेला प्रकार सांगितला त्यानंतर सदर ठिकाणी थोड्यावेळात सपोनि दहिफळे व इतर पोलीस पोहचले . या प्रकरणी साहिल अक्रम खॉन पठाण व सोबत चे इतर तीन अनोळखी विरुद्ध कलम १३२.१२१ (१) ११८(१).११५(२),३५२,३५१(२१,३ (५). नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

**वाल्मिक कराडला पॅनिक**

रक्त चाचणीचा अहवाल आणि सिटीस्कॅनचा अहवाल आल्यानंतर त्याच्यावर पुढील उपचार केला जाणार असल्याची माहिती आहे.संतोष देशमुख हत्या प्रकरणात मुख्य सुत्रधार म्हणून कोर्टाकडून वाल्मिक कराडची तुरुंगात रवानगी करण्यात आली आहे. संतोष देशमुखांच्या हत्येचा कट वाल्मिक कराडनेच रचला होता. याचे सबळ पुरावे तपास यंत्रणांकडून कोर्टात सादर करण्यात आले आहेत. एसआयटी, सीआयडी आणि न्यायालयीन समितीकडून या प्रकरणाची त्रिकोणी चौकशी सुरु आहे. त्यानुसार कराड आणि त्याच्या टोळीतील अन्य सहा आरोपींवर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर कोर्टाने त्यांची कोठडीत रवानगी केली आहे. तर या प्रकरणातील आणखी एक आरोपी कृष्णा आंधळे सध्या फरार आहे. त्याचा तपास अद्याप पोलिसांकडून सुरु आहे.

**उपमुख्यमंत्री एकनाथ मदतीला**

शहीद आदिल हुसेन शहा आपल्यात नाहीत. मात्र त्यांच्या पाठीमागे त्यांच्या परिवारात भाऊ- बहीण आई, वडील असा परिवार आहे. ते परिवाराचे करते धरते एक जिम्मेदार वेक्ती होते. आज त्यांच्या जाण्याने त्या परिवारावर दुः खाचे डोंगर कोसळले आहे. या परिवाराचा उदरनिर्वाह करणाराच या जगात आज नसल्याने त्यामुळे आज आम्ही शहीद आदिल हुसेन शहा यांच्या परिवाराला भेट देण्यासाठी आलोत. आणि त्यांच्या परिवाराला तात्काळ भेट देऊन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या श्रीकांत शिंदे फाउंडेशन मार्फत आम्ही त्यांना तात्काळ मदत म्हणून रोख ५ लाखाची मदत केली आहे. सोबतच त्यांना एक पक्के घर बांधून देणार असल्याचेही यावेळी युवा सेना निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी बोलताना सांगितले आहे. त्यामुळे या भेटीतून महाराष्ट्राचे संवेदनशील उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब यांचा एका सच्चा भारतवासी आणि सामान्य व्यक्तीच्या मदतीसाठी धावून येण्याचा प्रसंग या भेटीतून दिसून आला. शिवसेना नक्कीच गोरगरीब सर्वसामान्य यांच्या हिताच्या बाजूने भक्कमपणे उभा राहण्याचं काम महाराष्ट्रासह देशभरात करत असल्याचे या भेटीतून दिसून आले आहे.

### आष्टीतील संत भगवान बाबा वस्तीगृह प्रकरणी अनियमिता

#### दोषींवर चौकशी करून कठोर कारवाई करावी - कैलास दरेकर

म्हसोबावाडी./प्रतिनिधी

ऊस तोडणीच्या ऐन हंगामात विविध गावे व तांड्यावरून दरवर्षी मोठ्या प्रमाणात मजुरांचे स्थलांतर होते या स्थलांतरामुळे त्यांच्या कुटुंबियांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते ऊसतोड कामगारांच्या मुला मुलींच्या शिक्षणाची सोय होण्याच्या दृष्टीने आष्टी तालुक्यात मुली व मुलांसाठी दोन वस्तीगृहाना मंजुरी प्राप्त झाली असून आष्टी शहरात वस्तीगृहासाठी जागा उपलब्ध नसल्याने सध्या ही दोन्ही वस्तीगृह भाड्याच्या जागेत सुरू करण्यात आलेली आहेत.परंतु या भाडे तत्त्वावर जागा घेताना यामध्ये मोठी अनियमितता झालेली असून संबंधित अधिकाऱ्यांनी जागा भाडे तत्त्वावर घेण्यासाठी कोणत्याही निकषाचे पालन केले नसल्याचा आरोप करत सदरील प्रकरणाची चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी मनसे शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केली आहे. या प्रकरणी दिलेल्या निवेदनात संबंधित अधिकाऱ्यांनी जागा भाडेतत्त्वावर घेण्यासाठी कोणत्याही जास्तीत जास्त खपाच्या वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन देण्यात आलेले नसल्याचे सांगत अर्जदार वेगळाच व जागा वेगळ्या तीन व्यक्तींच्या नावावर असताना नियमबाह्यपणे भाडे करार करण्यात आला असल्याचा आरोप दरेकर यांनी केला आहे तसेच संबंधित अर्जदारांच्या नावे ९८८० चौरस मीटर जागा उपलब्ध असताना ग्रहपाल, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वस्तीग्रह त्याच ठिकाणी कसे देण्यात आले,तसेच या ठिकाणी बँक, दवाखाना, मेडिकल, व्यापारी गाळे,असताना व अर्जदार स्वतःही त्याच ठिकाणी राहत असताना जागेची स्थळ पाणी न करता भाडे करार कसे करण्यात आले याची चौकशी होणे गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## पान सहा वरून

**...त्या फक्त पोस्ट करण्यात**

मुंदडाच करतात मग आमदारा नमीता लोखंडे काय लग्न, सप्ताह, वास्तुशांती ,सात्वन पर भेट,जयंती उत्सव,यांच्या साठी आमदार झाल्या आहेत का तसेच कुठल्याही कार्यक्रमाचे विविध गाण्यावर विडीओ पोस्ट करणे म्हणजे जनु काय एखाद्या साधु संतच आहेत अशा अभंगावर विडीओ पोस्ट करणे म्हणजे आमदार नमीता लोखंडे फक्त नावाला आमदार आहेत का असा प्रश्न नागकांना पडला चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरु झाले आहे.

शैक्षणिक धोरणाविरोधात

उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू शिनगारे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समिती अध्यक्ष सचिन वाव्हळ, उपाध्यक्ष अंकुश वाव्हळ, सचिव उत्तम वाव्हळ,सह सचिव रवि वाव्हळ सल्लागार लक्ष्मण वाव्हळ,सह सल्लागार संतोष वाव्हळ, कोषाध्यक्ष रामप्रभु वाव्हळ,संघटक शिवाजी वाव्हळ,सह संघटक रमेश वाव्हळ, संरक्षण प्रमुख अनिल वाव्हळ यांनी प्रयत्न केले.या कार्यक्रमास गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिक्षणाची दारे खुली**

आजच्या काळात इतक्या सुविधा उपलब्ध असतांना सुद्धा समाज बांधवामध्ये शिक्षणाचा अभाव दिसून येत आहे. स्वःताची व परिवाराची प्रगती साध्य करण्यासाठी शिक्षण घेणे काळाची गरज आहे. यावेळी अरुण भालेराव, किसन तांगडे, अजिनाथ गवळी, शहादेव खेडकर, बासाहेब नागरे,एस.टी. गायकवाड, फैय्याज शेख, प्रकाश खेडकर, दशरथ गवळी, विजय मोरे, सतिष मुरकुटे, मनोज परदेशी, प्रकाश साळवे, पंडीत जावळे, धम्मा पारवेकर, महेश कागदे, अशोक मस्के, बबन मस्के, नाना कांबळे, दयानंद उबाळे, बाबसाहेब डोंगरे, नामदेव उबाळे यांच्यासह शेकडो भीम अनुयायी उपस्थित होते.

**परळीत गायींना दिले**

यांना संपर्क साधून या प्रकारामागे जे कोणी असतील त्यांना तातडीने अटक करून कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. गुंगीचे औषध मिश्रित पदार्थ खाल्याने ज्या गायी बाधित झाल्या होत्या त्यावर त्वरेने उपचार करण्यास त्यांनी सांगितल्यानंतर पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी उपचार करून चार गायींना धोक्यात बाहेर काढले, एका गायीवर उपचार सुरू आहेत.

**निलज्योती संस्थेकडून**

क्रमांक सायली बर्डे , द्वितीय क्रमांक यश इंगोले व तृतीय क्रमांक दिशा मेंगडे यांनी मिळवला. गुरुनानक प्राथमिक विद्यालय बीडमधून प्रथम क्रमांक अनुश गदळे , द्वितीय क्रमांक सृष्टी आंधळे व तृतीय क्रमांक अनुजा पवार यांनी मिळवला. छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालय बीड मधून प्रथम क्रमांक आमिनेस गिरे , द्वितीय क्रमांक शिवतेज कागदे व तृतीय क्रमांक सृष्टी जाधव यांनी मिळवला. व्हिक्ट्री इंग्लिश स्कूल मधून गट अ प्रथम क्रमांक उत्कर्ष वाडचकर , द्वितीय क्रमांक अधिरा चव्हाण व तृतीय क्रमांक हुझेफा शेख यांनी मिळवला. गट ब मधून प्रथम क्रमांक सम्राट कसबे , द्वितीय क्रमांक जगदीश ढोले व तृतीय क्रमांक आक्सा शेख यांनी मिळाला. गट क मधून प्रथम क्रमांक झईद बेग , द्वितीय क्रमांक आरफान शेख तृतीय क्रमांक कार्तिक शिंदे या विद्यार्थ्याने मिळवला. सामान्य ज्ञान स्पर्धेत यश मिळवणाऱ्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातून कौतुक होत आहे.

**पाथर्डी शाळेत विद्यार्थ्यांचा**

धनराज पिंगळे यांचा शाळेच्या वतीने शाल, बुके, पुष्पहार, छत्रपती शिवाजी महाराजांचे पुस्तक, पॅड, पेन व शालेय साहित्य देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांच्या शुभ हस्ते या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक सरोजिनी पोते व धनंजय गव्हाणे यांचा छत्रपती शिवाजी महाराज पुस्तक व गुलाब पुष्प देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांनी मार्गदर्शन केले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## ब्रम्हाळा तलाव येथे जनजागृती उपक्रम

**ठाणे :** ठाणे महापालिकेतर्फे २२ एप्रिल ते ०१ मे या काळात वसुंधरा सप्ताह साजरा केला जात आहे. त्याअंतर्गत, शुक्रवारी ब्रम्हाळा तलाव येथे जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात, पर्यावरणपूरक संवर्धनासाठी ब्रम्हाळा तलाव येथे तरंगत्या पाणथळ



पटट्या (फ्लोटिंग वेटलँड्स) बसवण्यात आल्या. हा उपक्रम ठाणे महापालिका आणि कोलगेट कंपनीच्या सीएसआर निधीतून राबवण्यात आला. त्यास, भगीरथ व गुडेरा या संस्थांचे सहकार्य लाभले. या उपक्रमासाठी पर्यावरण विभागाच्या प्रमुख मनीषा प्रधान, ओम परळकर, प्रभाकर सोनावले यांनी मार्गदर्शन केले. स्वयंसेवकांच्या मदतीने या पाणथळ पट्ट्या तलावात सोडण्यात आल्या. या उपक्रमास माजी नगरसेवक कृष्णा पाटील यांनीही भेट दिली.

## वेचक

### पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ दिवा बंद




**ठाणे :** काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी दिवा शहरातील दिवा मर्चंट व्यापारी संस्थेमार्फत दिवा शहर बंदची हाक देण्यात आली होती. व्यापारी संघटनेच्या अध्यक्षा ज्योती राजकांत पाटील यांनी व्यापाऱ्यांना केलेल्या आवाहनानंतर दिवा शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. दिवा शहरातील व्यापाऱ्यांनी रस्त्यावर उतरून दहशतवाद्यांचा निषेध केला. दिवा शहरातील व्यापाऱ्यांनी पाकिस्तानच्या या कृत्याचा निषेध करत पाकिस्तानचा झेंडा जाळला. त्याचबरोबर या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना व्यापारी संघटनेच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. व्यापारी संस्थेच्या अध्यक्षा ज्योती पाटील यांनी केलेल्या आवाहनाप्रमाणे दुकानदार, व्यापाऱ्यांकडून प्रतिसाद देत बंद पाळत निषेध केला.

### ठाण्यात शिवसेना युवासेनेचे अनोखे आंदोलन



**ठाणे :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या आतंकवादी हल्ल्याच्या विरोधात निषेधार्थ आज शिवसेना व युवासेनेच्या वतीने ठाण्यातील टेंभी नाका परिसरातील सार्वजनिक शौचालयात जाऊन पाकिस्तानचा झेंडा व पोस्टर चिटकवण्यात आले व दहशवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला तसेच जमिनीवरही झेंडा पोस्टर चिटकवण्यात आले व पायदळी तुडवण्यात आले यावेळी युवासेनेचे अध्यक्ष नितीन लांडगे व टेंभी नाका शिवसेना शाखाप्रमुख निखिल बुडजडे यांच्या नेतृत्वाखाली सदर आंदोलनात शिवसैनिक, युवसैनिक तसेच मुस्लीम कार्यकर्त्यांचा देखील सहभाग मोठ्या प्रमाणात होता.

### मोफत वैद्यकीय शिबीर, शैक्षणिक साहित्य वाटप

**कल्याण :** कै. अश्विनी रवींद्र तरे यांच्या चतुर्थ पुण्यतिथीनिमित्त, त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्थापन करण्यात आलेल्या चिऊताई फाऊंडेशनच्या वतीने भिवंडी येथील कशेळी मराठी शाळेत 'आमच्या हिरकणीचा स्मृतीगंध २०२५' या विशेष उपक्रमांतर्गत मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर, विद्यार्थ्यांसाठी मोफत शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटपाचे आयोजन करण्यात आले. पुर्ण प्राथमिक विद्यामंदिर कशेळी येथील मराठी माध्यमाच्या मुलांसाठी चिऊताई फाऊंडेशनचे अध्यक्ष रवींद्र तरे, सचिव गणेश तरे यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य अन् खाऊचे वाटप करण्याच आले. तसेच वैद्यकीय तपासणी शिबिरात डोळे तपासणी, रक्त तपासणी, थायरॉईड, शुगर तपासणीसह महिलांसाठी विशेष वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात डॉ. विजय बैरागी (नेत्ररोगतज्ज्ञ), डॉ. विनोद पावरा व डॉ. शोभा पाटील (फॅमिली फिजिशियन) यांचा विशेष सहभाग होता.

### शिवमुद्रा नृत्यालयाचा वार्षिक मेळावा साजरा

**कल्याण :** शास्त्रीय नृत्य प्रशिक्षण देणाऱ्या शिव मुद्रा नृत्यालयाचा वार्षिक सांस्कृतिक मेळावा कल्याणमधील के. सी. गांधी हायस्कूलच्या ऑडिटोरियममध्ये पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शासणे एम.डी.होमिओपॅथी आणि नृत्योपचार तज्ज्ञ (कथकली) यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात शिवमुद्रा नृत्यालयाच्या विद्यार्थिनींनी राधिका यांच्या मार्गदर्शनाखाली १५ नृत्य प्रकार सादर केले. त्यात भरतनाट्यमद्वारे अबीर गुलाल(अभंगम्), कावडी चिंदू, गणपती कौतवम, पुष्पांजली भरतनाट्यम हुला हुप, दशावतार तसेच शिवधनुष्य प्रसंग आणि शेवटी सीता स्वयंवर असे विविध नृत्य प्रकार सादर केले. यावेळी विशेष पाहुण्या कलाकार म्हणून मीरा महाजन आणि शमिका पालेकर यांनी विशेष कथ्थक नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.



# ठाणे महापालिका क्षेत्रातील रस्ते दुरुस्तीची कामे ‘२० मे’पर्यंत पूर्ण करा

## घोडबंदर रोडवर कामांची पाहणी करत आयुक्त सौरभ राव यांनी दिले निर्देश

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**



ठाणे महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या रस्ते दुरुस्तीच्या कामांची पाहणी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी शुक्रवारी सर्व प्राधिकरणासह केली. घोडबंदर रस्त्यावर सद्यस्थितीत सुरू असलेली कामे २० मेपर्यंत पूर्ण करून रस्ते वाहतुकीसाठी सुरू करावेत, तसेच जी कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणार नाही. अशा कामांची सुरुवात पावसाळ्यानंतर करण्याचे निर्देश ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, मेट्रो, एमएमआरडीए या सर्व यंत्रणांना दिले.

पूर्व द्रुतगती महामार्ग, कापूरबावडी जंक्शन, घोडबंदर रोड, सेवा रस्ता आणि गायमुख घाट या परिसरात सुरू असलेल्या कामांची पावसाळ्यासाठीच्या तयारीच्या दृष्टीने पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट, मेट्रोचे अधिक्षक अभियंता अभिजीत दिसीकर यांच्यासह महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएमआरडीएचे अधिकारी, मेट्रो, महावितरण आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पावसाळा लक्षात घेवून पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने घोडबंदर रस्त्यावर सुरू असलेल्या कामांची पाहणी ही दर चार आठवड्यांनी करीत असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. या पाहणीदौऱ्यास ठाणे आणि महापालिकेची सर्व यंत्रणा, सार्वजनिक बांधकाम विभाग, मेट्रो, एमएमआरडीए, महावितरण, वाहतूक पोलीस यांचे अधिकारी उपस्थित असून कालबद्ध पद्धतीने कामाचे नियोजन करुन त्यावर सर्व लक्ष ठेवून असल्याचे त्यांनी नमूद केले. मान्सूनच्या अगोदर घोडबंदररोडवरील वाहतूक सुरळीत व्हावी हा मुख्य हेतू असून त्या आनुषंगाने सतत कामाच्या प्रगतीचा आढावा घेत असल्याचे त्यांनी सांगितले. कॅडबरी जंक्शन ते गायमुख या भागाची पाहणी काही दिवसांपूर्वी करण्यात आली होती, त्या आनुषंगाने मलनिस्सारण वाहिन्या बदलण्याची सर्व कामे २० में पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या. तसेच मेट्रोच्या ज्या ठिकाणची कामे झाली आहे, अशा ठिकाणी पडलेले बॅरीगेटस्, पाइपलाइन, डेब्रीज व इतर साहित्य ज्याची आवश्यकता नाही असे साहित्य तातडीने उचलण्याच्या सूचनाही आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या. पावसाळ्यात गटारे, नाल्यामुळे रस्त्यावर पाणी येणार नाही या दृष्टीने कलर्व्हटचे डीप क्लिनींगचे काम हाती घेण्यात येणार आहे. यासाठी स्वतः कार्यकारी अभियंता याची पाहणी करणार आहेत. घोडबंदर रोडवर जुन्या झालेल्या ड्रेनेज लाईनचे काम सुरू आहे, त्या जोडल्या गेल्या आहेत की नाही याची काळजी घेणे. पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह अडणार नाही या दृष्टीने काम करण्याच्या सूचनाही आयुक्तांनी दिल्या. कासारवडवली व भाईंदरपाडा येथील उड्डाणपुलाचे काम देखील प्रगतिपथावर सुरू आहे. हे दोन्ही उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले झाल्यावर वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. या उड्डाणपुलाची उर्वरित कामेही २०मे पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. तसेच कासारवडवली येथील उड्डाणपुलाच्या बाजूला असलेले महावितरणचे काम त्यांनी जलद स्थलांतरित करण्यास सांगण्यात आले. येत्या २५ ते २८ एप्रिल दरम्यान गायमुख घाटाच्या पॅचिंगचे काम हाती घेणार आहे. पॅचवर्क करत असतानाच माजिवडा पुलावर देखील पॅचवर्क करण्यात येणार आहे. गायमुख घाटाची विशेष काळजी घेतली जाणार आहे, जेणेकरून पावसाळ्यात वाहतूक कोंडी होणार नाही. यासाठी वाहतूक विभागाने सर्व नियोजन केले असून वाहतूकीसाठी चार दिवस विशेष ब्लॉग घेवून ही कामे पूर्ण केली जाणार असल्याचे आयुक्तांनी नमूद केले. दरवर्षी पावसाळ्यात ज्या रस्त्यांवर खड्डे पडतात अशा ठिकाणांची पाहणी करुन त्या ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना पावसाळ्यापूर्वी करण्यात येणार आहे. घोडबंदररोडवर विविध कामे एकाचवेळी सुरू नागरिकांनी देखील सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त सौरभ राव यांनी यावेळी केले.

### आयुक्तांनी केला टीएमटी बसमधून पाहणी दौरा

घोडबंदर रोडवर सद्यस्थितीत कामे सुरू असून पाहणीदौरा करताना अधिकाऱ्यांच्या गाड्यांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये यासाठी आजचा पाहणी दौरा हा सर्व प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांसमेवत परिवहन सेवेच्या बसेसमधून केला असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.

### उपाययोजनाच न केल्याचा रहिवाशांचा आरोप

## सिद्धेश्वर तलावातील प्रदूषणाने घेतला हजारो माशांचा जीव



◆ **ठाणे(प्रतिनिधी):**

शहराच्या मध्यवर्ती भागातील सिद्धेश्वर तलावात हजारो माशांचा मृत्यू झाला असल्याची घटना घडली आहे. या तलावातील प्रदूषण दूर करण्यासाठी महापालिकेने उपाययोजना न केल्यामुळे माशांचा मृत्यू झाला असल्याचा आरोप भाजपाचे माजी गटनेते नारायण पवार यांनी केला आहे.

सिद्धेश्वर तलावाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिक राहत असून, सातत्याने तलावातील प्रदूषणात वाढ होत आहे. तलावात ठिकठिकाणी जलपर्णी साचली आहे. या तलावाची निगा राखण्याचे काम कंत्राटदाराला देण्यात आले आहे. मात्र, त्याच्याकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. या संदर्भात महापालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभागाकडे सातत्याने तक्रारी करूनही जलपर्णी काढली गेली नाही. त्यामुळे या तलावातील हजारो माशांचा मृत्यू झाला, असा आरोप भाजपाचे माजी नगरसेवक नारायण पवार यांनी केला. तसेच या संदर्भात महापालिका आयुक्त सौरभ राव यांना पत्र पाठवून कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच तलावातील प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याची विनंती केली आहे.

तलावात मासे मरून पडल्याची माहिती मिळताच नारायण पवार यांच्यासह नागरिकांनी तलावाच्या परिसरात येऊन महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडे संपर्क साधला. मृत माशांमध्ये मोठ्या माशांचे प्रमाण लक्षवेधी आहे.

> “तलावात मोठ्या प्रमाणात सांडपाणी सोडण्यात येते. त्याचप्रमाणे या ठिकाणी जलपर्णी देखील मोठ्या प्रमाणावर आहे. तलावातील मेलेले मासे, आणि जलपर्णी हटवण्याचे काम तत्काळ सुरू करण्यात आले आहे. तलावात सांडपाणी कसे जाणार नाही याबाबत आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली तत्काळ उपाय योजना करण्यात येणार आहे. "
> - **मनीषा प्रधान,** मुख्य पर्यावरण अधिकारी, ठाणे महानगरपालिका.

## महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेत २०० विजेत्यांना बक्षिसांचे वितरण



◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा पहिला लकी ड्रॉ ऑनलाईन पद्धतीने ७ एप्रिलला काढण्यात आला आहे. या लकी ड्रॉ मध्ये कल्याण परिमंडलात पहिल्या क्रमांकाचे ४०, तर दुसऱ्या क्रमांकासाठी ८० व तिसऱ्या क्रमांकासाठी ८० असे एकूण २०० विजेते जाहिर करण्यात आले. विजेत्या ग्राहकांची माहिती महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली असून त्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात येत आहे. कल्याण परिमंडलात ४० उपविभाग असून प्रत्येक उपविभाग स्तरावर एक या प्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ४० विजेत्या ग्राहकांना सॅमसंग कंपनीचा स्मार्ट फोन दुसऱ्या क्रमांकासाठी ८० विजेत्या ग्राहकांना रेडमी कंपनीचे स्मार्ट फोन व तिसऱ्या क्रमांकासाठी ८० विजेत्या ग्राहकांना स्मार्ट वॉच बक्षिस देण्यात येत आहे. यापुढील लकी ड्रॉ मे व जून महिन्यात काढण्यात येणार असून आणखी ४०० बक्षिसे जिंकण्याची संधी परिमंडलातील ग्राहकांना आहे. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन किंवा तीन पेक्षा अधिक वीज बिले ऑनलाईन पद्धतीने भरणाऱ्या ग्राहकांना योजनेच्या लाभाची संधी आहे. ऑनलाईन वीजबिल भरणा करणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या वीजबिलावर ०.२५ टक्के सवलत देण्यात येते. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास www.mahadiscom.in भेट देण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## मीरा-भाईंदरमध्ये ‘आपला दवाखाना’चे लोकार्पण

**मीरा-भाईंदर :** महाराष्ट्र शासनाच्या 'आपला दवाखाना' या आरोग्य उपक्रमांतर्गत मीरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पेणकरपाडा येथे 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' याचे लोकार्पण महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे यांच्या हस्ते झाले. 'आपला दवाखाना' हा उपक्रम नागरिकांसाठी मोफत सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू केला. या दवाखान्यांद्वारे सामान्य नागरिकांना त्यांच्या घराच्या जवळच प्राथमिक आरोग्य तपासणी, मोफत औषधे अशा सुविधा अत्यंत सुलभपणे उपलब्ध होणार आहेत. मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने पेणकरपाडा येथे सुरू झालेल्या या दवाखान्यामुळे रहिवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.



## भांडुप परिमंडलाच्या मुख्य अभियंता पदाचा प्रभार चंद्रमणि मिश्रा यांच्याकडे

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**



महावितरणच्या भांडूप नागरी परिमंडलात २०२२ पासून मुख्य अभियंता पदी असलेले श्री. सुनील काकडे यांची गुरुवारी, २४ एप्रिल २०२५ रोजी पुणे परिमंडलात समकक्ष पदावर बदली झाली आहे. त्यांनी वीजबिल वसुली, वीज गळती व वीज चोरी रोखण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. तसेच, त्यांनी विविध आव्हानांना अतिशय कुशलतेने व यशस्वीरीत्या पार पडले आहेत. सुनील काकडे यांची बदली झाल्यामुळे मुख्य अभियंताचा पदभार सध्या कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. चंद्रमणि मिश्रा यांना प्रभारी म्हणून देण्यात आला आहे.

मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा हे मूळचे मुंबईचे रहिवासी आहेत. २००९ मध्ये थेट भरती प्रक्रियेमधून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. त्यानंतर पदोन्नतीवर २०१८ पासून अधीक्षक अभियंता म्हणून मुख्य कार्यालयातील विशेष प्रकल्प विभागात त्यांनी उल्लेखनिय कामगिरी केली. २०१९ ते २०२२ या कालावधीत मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेंतर्गत राज्यात शेतकऱ्यासांठी एक लाख सौर कृषिपंप कार्यान्वित झाले. जून २०२४ मध्ये त्यांना कल्याण परिमंडलाच्या मुख्य अभियंतापदी पदोन्नती मिळाली. सध्या, त्यांना भांडुप परिमंडलाचा प्रभारी मुख्य अभियंताचा पदभार मिळाला असून तत्पर व गतिमान सेवेतून उत्कृष्ट व अखंडित ग्राहक सेवेला प्राधान्य देण्यात येऊन महावितरणच्या विविध योजना व सेवा ग्राहकापर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच महसूल वाढीसाठी सामूहिक प्रयत्न करण्यात येतील असे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांनी यावेळी सांगितले.

## कल्याणमध्ये दहशतवादी हल्ल्याचा निषेध




**कल्याण :** अधिवक्ता परिषद, कल्याण तालुक्याच्या वतीने पहलगाम, जम्मू-कश्मीर येथे भारतीय नागरिकांवर दहशतवादी संघटनांकडून करण्यात आलेल्या भ्याड व अमानुष हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला. यासंदर्भात कल्याणच्या छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जाहीर निषेध आंदोलनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अधिवक्ता परिषद, कल्याण तालुका संघटनेचे पदाधिकारी, सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून दहशतवादाचा जाहीर निषेध केला. यावेळी अधिवक्ता परिषद कल्याण तालुका संघटनेचे तालुका अध्यक्ष ॲड. प्रल्हाद भिलारे, तालुका पालक ॲड. सतीश अत्रे, जिल्हा सहसचिव ॲड. अर्चना सबणीस, वरिष्ठ अधिवक्ता के. टी. जैन, प्रमुख पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाण्यातील नाले झाले टर्फ अन् रस्ते

## नालेसफाई करण्याचे आमदार संजय केळकर यांचे आदेश

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**



रुस्तमजी परिसरातील नाला तुंबल्याने तो जणू रस्ताच झाला असून बाळकुम दादलानी परिसरातील नाल्याची स्थिती, तर टर्फसारखी झाली आहे. आयुक्त आणि अधिकाऱ्यांनी रस्त्यावर उतरून नियमितपणे पाहणी करावी, पूर्वीसारखी नालेसफाई यंदा झाली तर ठाणेकर अधिकारी आणि ठेकेदारांना सोडणार नाहीत, असा इशारा आमदार संजय केळकर यांनी दिला.

नालेसफाईत दरवर्षी होत असलेल्या हात की सफाईचा अनुभव लक्षात घेत आमदार संजय केळकर यांनी ठाण्यातील मनोरमा नगर, कोलशेत, बाळकुम, राबोडी, कॅसल मिल, खोपट एसटी डेपो, शहीद गार्डन, रायगड आळी आदी परिसरातील नाल्याची पाहणी केली. यावेळी नाल्यांच्या स्थितीबाबत त्यांनी चिंता व्यक्त करत कंत्राटदार आणि प्रशासनाला गर्भित इशारा दिला. या पाहणीत त्यांना नाल्यांची दुरवस्था नजरेस पडली. यावेळी त्यांनी ठेकेदारांच्या बनवाबनवीचे दाखलेही दिले. ठेकेदारांनी नालेसफाई करण्यापूर्वी फिरून त्याची पाहणीच केलेली नाही. केवळ चार भिंतीत बसून बिले तयार करत असल्याचा आरोप केळकर यांनी केला. नालेसफाई करण्यासाठी लागणारे मनुष्यबळ, यांत्रिक सामग्री, कामाचे तास याबाबत ठेकेदार लपवाछपवी करत असतात. नालेसफाईसाठी आठ कोटींची तरतूद करण्यात आली. त्यात हात की सफाई होऊ नये म्हणून आयुक्त आणि अधिकाऱ्यांनी देखील रस्त्यावर उतरून वेळोवेळी पाहणी करावी, गतवर्षीप्रमाणे यात फसवणूक झालेली आढळून आली तर ठाणेकर अधिकाऱ्यांना सोडणार नाही, असा इशारा केळकर यांनी दिला.

## अमरनाथ यात्रेतील भाविकांच्या संख्येत घट

**ठाणे :** जम्मू-काश्मीरमधील पाहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे अमरनाथ यात्रेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. यात्रेसाठी वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य असून, एरवी सिव्हिल रुग्णालयात प्रमाणपत्र घेण्यासाठी गर्दी होते. मात्र शुक्रवारी केवळ एकाच व्यक्तीचा फिटनेस प्रमाणपत्रासाठी अर्ज आला होता. अमरनाथ यात्रेसाठी वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य आहे. मात्र सिव्हिल रुग्णालयात प्रमाणपत्र घेण्यासाठी संख्या रोडावली आहे. ठाणे सिव्हिल रुग्णालयात ८ एप्रिलपासून अमरनाथ यात्रेसाठी वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र देण्याची सोय केली आहे. पहिल्याच दिवशी साधारण ७५ भाविकांचे प्रमाणपत्रासाठी अर्ज आले होते. मात्र हल्ल्यानंतर ही प्रमाणपत्र घेण्यासाठी संख्या घटली आहे.

## बैलांवर घटनेचे चित्र रेखाटत, पहलगाम हल्ल्याचा निषेध



◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याविरोधात डोंबिवलीत बैलगाडा संघटना रस्त्यावर उतरली आहे. काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला आहे. या नक्षलवादी हल्ल्याच्या विरोधात डोंबिवली-बदलापूर पाइपलाइन मार्गावर अखिल भारतीय बैलगाडा संघटना उतरली रस्त्यावर उतरली असून यावेळी निषेध मोर्चा काढण्यात आला.

यावेळी बैलगाडा मालकांनी पाकिस्तान विरोधात जोरदार घोषणाबाजी केली आणि बैलगाडा मालकांनी जनावरांवर मन हेलवण्याऱ्या घटनेच चित्र रेखाटत या हल्ल्याचा निषेध केला. दरम्यान निषेध करण्यासाठी ठाणे, रायगड, पालघर, नाशिक आणि पुणे जिल्ह्यातून बैलगाडा मालक आले असल्याची माहिती अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष संदीप माळी यांनी दिली.

### उल्हास नदीवरील बंधारा बांधण्याचा प्रश्न लागणार मार्गी

# मोहने बंधाऱ्यालगत बांधणार नवीन बंधारा

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**



उल्हास नदीवरील मोहने येथील जुना बंधाऱ्यालगत नवीन बंधारा बांधण्याबाबतचा प्रश्न मार्गी लागला असल्याने मी कल्याणकर सामाजिक संस्थेच्या मागणीला यश आले आहे. उल्हास नदीतील मोहोने बंधारा येथून उल्हास नदीचे पाणी अडवून, कल्याण डोंबिवली मनपा, एमआयडीसी, स्टेम आणि काही औघगिक कंपन्या पाणी उचलतात आणि पाणीपुरवठा करतात.

मोहने बंधारा हा १९५० साली ७३ वर्षांपूर्वी एनआरसी कंपनीने बांधला होता. सद्यास्थितीत त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली आहे, भविष्यात जर हा बंधारा फुटला तर संपूर्ण जिल्ह्यात मोठे पाणीसंकट उभे राहू शकते, भविष्यातील संकट लक्षात घेता या बंधाऱ्याच्या काही मीटर अंतरावर एक नवीन बंधारा बांधण्यात यावा ही गेल्या ९ वर्षांपासून मी कल्याणकर सामाजिक संस्था, उल्हास नदी बचाव प्रेमीची मागणी होती. कळवा येथील पाटबंधारे विभागातील कार्यकारी अभियंता नरेंद्र महाजन यांची मी कल्याणकर सामाजिक संस्था अध्यक्ष माजी नगरसेवक नितिन निकम, सहकारी माजी नगरसेवक उमेश बोरगावकर यांनी भेट घेतली.

मी कल्याणकर सामाजिक संस्था माध्यमातून २०२१ साली उल्हास नदीपात्रात आंदोलन केले होते. मोहने उल्हास नदी जुन्या बंधाऱ्याच्या लगत नवीन बंधारा बांधण्यात यावा याबाबत पाठपुरावा करीत होतो.

त्याची प्रशासनाने दखल घेतली असून लवकरच या बंधाऱ्यासाठी निविदा काढण्यात येणार असून साधारण दोन वर्षांत हे काम पूर्ण केले जाणार असल्याचे महाजन यांनी सांगितले. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून साचलेल्या बंधाऱ्याजवळील सर्व मलमूत्र गाळ काढून नदीचे शुद्धीकरण करणार असल्याचे महाजन यांनी सांगत सदर बंधाऱ्यासाठी व गाळ काढण्यासाठी लागणारा सर्व निधी हा पाटबंधारे विभाग उपलब्ध करून देणार असल्याची माहिती दिली. प्रशासनाच्या या दिलेल्या माहितीमुळे उल्हासनदी मोहने बंधार्यालगत नवीन बंधारा बांधण्याचा प्रश्न मार्गी लागल्याचे यानिमित्ताने दिसत आहे. उल्हास खोरे पाटबंधारे विभाग कळवा यांच्या अधिकारी सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, मोहने उल्हासनदी नवीन बंधारा बॅरेज पद्धतीचा बांधण्यात येणार असून यांची लांबी १७० मीटर लांब, यामध्ये तीन गेट व्हर्टिकल आणि बाकीच्या गाळ्यांना देखील गेट असणार असून पावसाळ्यात गेट उघडल्यावर गाळ, जलपर्णी वैगेरे वाहून जाईल. यामध्ये नवतंत्रज्ञानाचा उपयोग केला जाणार असून सुमारे ७७ कोटी रु. खर्च अपेक्षित असून आरखाडा तयार आहे.

## 'ठाणे, नवी मुंबईतील रेल्वे स्थानकांत सोयीसुविधा पुरवा'

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**



ठाणे आणि नवी मुंबई विभागीय रेल्वे प्रवाशांच्या समस्या आणि मागण्यासंदर्भात खासदार नरेश म्हस्के यांनी मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक हरेश मीना यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. यावेळी झालेल्या बैठकीत नवी मुंबईतील स्थानके आणि ठाणे रेल्वे स्टेशनवरील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. रेल्वे महाव्यवस्थापकांनी यावर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. या बैठकीला जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, शिवराम पाटील, शहर संघटक नंदा काटे, बाळा गवस, जयेश जाधव, अजित दुबे आदी उपस्थित होते. यावेळी करण्यात आलेल्या चर्चेत वर्तकनगर येथील आरक्षण खिडकी सुरू करण्याबाबत नरेश म्हस्के यांनी निर्देश दिले. दिघा येथे असलेले पाण्याचे धरण नवी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत झाल्यास दिघा येथील पाणी समस्या दूर होण्यास मदत होईल, असे म्हस्के यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच सर्व रेल्वे स्थानकांमधील शेड पत्रे, पंखे, लाईट, स्थानकाबाहेरचा परिसर स्वच्छ करणे, पिण्याच्या पाण्याचे कुलर बसविण्यात यावे. ऐरोली स्थानकामध्ये आरक्षण खिडकी सुरू करणे,सानपाडा ते जुईनगर रेल्वे पुलाचे थांबलेले काम सुरू करणे अशा अनेक समस्यांसंदर्भात डीआरएम हरेश मीना यांच्याशी चर्चा करून या समस्यांबाबत निर्णय घ्यावा अशी सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी केली. नवी मुंबई शहरातील रेल्वे स्थानकांचा पाहणी दौरा आयोजित करण्यात येणार आहे. सिडकोकडील रेल्वे स्टेशनच्या समस्या सिडको अधिकाऱ्यांशी चर्चा करून लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे खासदार नरेश म्हस्के यांनी यावेळी सांगितले.

# नाले व कचरा सफाई ; केवळ कागदावरच नसावी

पावसाळा आता जेमतेम सव्वा महिन्यावर आलेला आहे. पावसाळी हंगामास दरवर्षी कागदोपत्री १ जूनला सुरुवात होत असली तरी खऱ्या अर्थाने सहा-सात जूननंतरच पाऊस बरसण्यास सुरुवात होते. पावसाळा सुरू झाल्यावर पथदिवे बंद पडलेले, रस्त्यात खड्डे पडलेले, गटारे-नाले तुंबलेले, रस्ते जलमय झालेले असे चित्र कोठेही निर्माण होऊ नये यासाठी महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, नगर परिषदा या स्थानिक स्वराज्य संस्थांना एप्रिल आणि मे या दोन महिन्यांतच पावसाळीपूर्व कामांना गती द्यावी लागते. पावसाळीपूर्व कामांसाठी अर्थसंकल्पामध्ये विशेष निधीची तरतूद करण्यात येत असते. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सभागृह अस्तित्वात असताना प्रशासन या कामांची यादी सादर करत असते व लोकप्रतिनिधी या कामांना मंजुरी देत असतात; परंतु कोरोना महामारीच्या साथीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्याच नसल्याने सर्वत्र प्रशासकीय राजवट असून प्रशासकाच्या मार्गदर्शनाखाली त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार सध्या चालविला जात आहे. मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प देशातील काही छोट्या राज्याहून मोठा आहे.

केवळ अर्थसंकल्पच नाही, तर महापालिका कार्यक्षेत्रात येणारी लोकसंख्याही कोटींच्या घरात आहे; परंतु मुंबई महापालिकेचा भूभाग तुलनेने कमी असून त्या कमी भूभागातच ही लोकसंख्या सामावलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते हार्बरमार्गे मानखुर्दपर्यंत, मध्य रेल्वेने मुलुंडपर्यंत, पश्चिम रेल्वेने चर्चगेट ते दहिसरपर्यंत तसेच कुलाबा याचा समावेश करून येणाऱ्या परिसरात मुंबई महापालिका सामावलेली आहे. मुंबई शहराची लोकसंख्या वाढत असताना व जलपुरवठा करणाऱ्या तलावांची संख्या तितकीच असताना व जलवहिन्या जुनाट असतानाही मुंबईकरांना पाणीटंचाईचा सामना कधीही करावा लागत नाही, याबाबत महापालिकेच्या कामगिरीला खरोखरीच 'सलाम'च करावा लागेल. मुंबईतील नाले व गटारे पावसाळ्याचा अपवाद वगळता कोठेही तुंबलेले पाहावयास मिळत नाही. पथदिवे बंद दिसत नाही. मुसळधार पाऊस झाल्यास अथवा सोसाट्याचा वारा सुटला, तर फांद्या पडण्याच्या अथवा वृक्ष पडण्याच्या घटना घडत असतात. अन्यथा फारशा दुर्घटना घडत नाहीत. गेल्या काही वर्षांमध्ये मुंबईमध्ये पावसाचे पाणी तुंबण्याचे अथवा परिसर जलमय होण्याचे प्रमाणही मंदावलेले आहे. प्रशासकीय राजवटीत मुंबई महापालिकेच्या कामाला काही प्रमाणात 'शिस्त' लागलेली आहे, असे म्हणणे देखील अतिशयोक्तीचे ठरणार नाही. जवळ आलेला पावसाळा पाहता पावसाळीपूर्व कामासाठी मुंबई महापालिका प्रशासन सतर्क झाले असून अधिकारी व कर्मचारी कामाला लागले आहेत. मुळातच नालेसफाई व गटाराची तळापासून स्वच्छता या दोन गोष्टी सांभाळल्यास मुंबईची तुंबई होण्याची पुनरावृत्ती होत नाही आणि अलीकडच्या काळात त्याचे प्रमाणही कमी झालेले आहे.

महापालिका आयुक्त भूषण गगरानी यांनी पावसाळापूर्व कामांचा आढावा घेण्यास सुरुवात केल्याने अधिकारी व कर्मचारी त्या-त्या कामांना गती देऊ लागले आहेत. कंत्राटदारांचीही वेळेत कामे पूर्ण करून देण्यासाठी लगबग वाढली आहे. नाल्यातून काढलेला गाळ अनेकदा त्या ठिकाणी बरेच दिवस पडून असायचा, तो गाळ आणि कचरा वेळेत उचलला न गेल्यास कचरायुक्त गाळ रापण्यास सुरुवात होऊन त्या-त्या परिसरातील रहिवाशांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असतो. हे गांभीर्य लक्षात घेऊन महापालिका आयुक्त गगरानी यांनी नालेसफाईतून काढलेला गाळ ४८ तासांमध्ये उचलण्याचे ठेकेदारांना निर्देश दिले आहे. हा कचरामिश्रीत गाळ वेळेवर उचलला गेल्यास मुंबईकरांची दुर्गंधीतून व बकालपणापासून मुक्तता होण्यास मदतच होणार आहे. मुंबईत गटारांची व नाल्यांची संख्या मोठी असल्याने गटारांची सफाई व नालेसफाई करण्याचे अग्निदिव्य महापालिका प्रशासनाला दरवर्षीच पार पाडावे लागत आहे. याशिवाय गटारे व नाले नागरी वस्तीतून, चाळींमधून वाहत असल्याने त्या ठिकाणी नालेसफाई करताना करावी लागणारे कामे हा एकप्रकारे 'द्राविडी प्राणायम' असतो, ही अतिशयोक्ती नसून वास्तविकता आहे. रेल्वेसेवा विस्कळीत झाल्यास सर्व कारभार ठप्प होतो, असा आजवरचा अनुभव आहे. रेल्वे रुळावर गुडघाभर पाणी साचले तरी रेल्वे सेवेचा खोळंबा होण्यास फारसा वेळ लागत नाही. अन्य भागांमध्ये असणाऱ्या नाल्यांमध्ये जेसीपी उतरवून सफाई करण्यात येते. गाळ व साचलेला कचरा काढणे शक्य होते. मात्र रेल्वे हद्दीमध्ये जेसीपीच्या माध्यमातून नालेसफाई अशक्य असल्याने मानवी हातानेच येथील नालेसफाई आजही करण्यात येत आहे. त्यामुळे रेल्वे हद्दीतील नालेसफाई तळापासूनच करण्यात यावी, असे निर्देशच महापालिका प्रशासनाकडून ठेकेदाराला देण्यात येतात व शहारातील सर्व नालेसफाई ३१ मेपूर्वीच करण्याचे बंधनही संबंधित ठेकेदाराला घालून देण्यात आलेले असते. पावसाळीपूर्व कामामध्ये नालेसफाईचा भाग महत्त्वाचा असून त्याखालोखाल रस्त्यांची डागडुजीला प्राधान्य देण्यात येत असते. पावसाळा सुरू होण्यापूर्वीच रस्त्यांची पाहणी करून डांबरीकरणाच्या कामाला गती देण्यात आलेली असते. रस्त्यात खड्डे निर्माण झाल्यास वाहतुकीला अडथळा होतो, पाणी साचून साथीच्या आजारांना निमत्रंण मिळते. रस्त्यांचे काम करूनही मुसळधार पावसामुळे रस्त्याची हानी झाल्यास भरपावसातही खड्डे बुजविले जातात, वेळ पडल्यास माती, सिमेंट टाकून पेव्हर ब्लॉकच्या आधारावर खड्ड्यांच्या समस्येवर तोडगा काढण्यात येत असतो. त्यानंतर पालिका प्रशासन प्रभागाप्रभागातील वृक्षछाटणीला प्राधान्य दिले जाते. ठिसूळ झालेल्या फांद्या अथवा मोडकळीस आलेले वृक्ष पडून जीवितहानी अथवा वाहनांचे अपघात होण्याची भीती असते. त्यापार्श्वभूमीवर वृक्षछाटणी करून अपघात होऊ नये याची काळजी घेतली जाते. पथदिवे खराब झाल्यास पावसाळ्यात गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. रात्रीच्या अंधारात वाटमारी, लुटमारी, विनयभंग, अत्याचार अशा घटना घडण्याची भीती असते. या घटना घडू नये म्हणून पथदिव्यांची दुरुस्ती तसेच अंधूक प्रकाशाची समस्या हटविली जाते. पावसाळीपूर्व कामे वेळेत केल्यावर सततच्या पावसामुळे पदपथावर शेवाळ साचून रहिवासी घसरण्याच्या घटना घडतात. त्यामुळे पावसाळ्यात पदपथावर ब्लिचिंग पावडर टाकण्याची मोहीम उघडली जाते. पावसाळी पूर्व कामाला प्रशासनाकडून गती देण्यात आलेली आहे. अजूनही ठिकठिकाणी नाल्यातच कचरा, गाळ दिसून येत आहे. सव्वा महिन्याच्या कालावधीत ही कामे पूर्ण करावयाची असल्याने प्रशासनदेखील 'कामा'ला लागल्याचे मुंबई शहर व उपनगरातच पाहावयास मिळत आहे.

# मराठवाडा तहानलेलाच



उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. त्याच तुलनेत मराठवाड्यात तहानलेल्या गावांच्या संख्येतही दुप्पटीने वाढ होत आहे. मराठवाड्यात १८४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक तहानलेली गावे मराठवाड्यातच नोंदवली गेली आहेत. विभागीय आयुक्तालयाने यावर शिक्कामोर्तबही केले आहे. पाणीटंचाईची भीषण परिस्थिती छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत जाणवत आहे. गेल्या वर्षी पाऊस चांगला झाला असला तरी, टंचाई मात्र कमी झालेली नाही. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १३५ टँकरद्वारे तहानलेल्या ९३ गावांत व १२ वाड्यांना पाणीपुरवठा केला जात आहे. जालना जिल्ह्यात मागच्या आठवड्यापर्यंत ४७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला, तर नांदेड जिल्ह्यात दोन टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याची नोंद विभागीय आयुक्तालय कार्यालयात आहे.

मराठवाड्यात काही दिवसांपूर्वी अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. नुकसानीचे पंचनामे लवकर होतील, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करित आहेत. या संकटातून शेतकरी सावरले असतानाच पुन्हा पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागत आहेत. सध्या कडक उष्णता जाणवत असल्यामुळे मराठवाड्यात गरज असलेल्या जिल्ह्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेडपाठोपाठ आता जालना जिल्ह्यातही पाणीटंचाईने डोके वर काढले आहे. या तीनही जिल्ह्यांत तहानलेली गावे व वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे, तर विभागातील अन्य जिल्हे सुदैवाने अद्यापही टँकरमुक्त आहेत. काही जिल्ह्यात टँकरची मागणी असून त्यादृष्टीने प्रशासन स्तरावर कामकाज केले जात आहे. गेल्या वर्षी पावसाने चांगली हजेरी लावली होती. त्यामुळे सध्यास्थितीत अन्य जिल्ह्यांत टँकरची गरज मार्च महिन्यात भासली नाही; परंतु एप्रिल महिन्यात उन्हाची तीव्रता वाढल्याने सर्वच जिल्ह्यांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ येणार आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी मागच्यावर्षी पाऊसमान चांगले झाल्याने टंचाई निर्माण होणार नाही, असा अंदाज बांधत टंचाई कृती आराखड्यामध्ये एप्रिलपासून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात टँकर सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले; परंतु निम्मा मार्च महिना संपलेला नसतानाच प्रारंभी वैजापूर तालुक्यातील सावखेड खंडाळा, दसकुली, तिढ्डी, आधुर, लोणी बु. आधुर, माळीसागज, मकरमतपूर, कनकसागज यासह अन्य काही तालुक्यातील गावांतून टँकर सुरू करा अशी मागणी झाली. प्रारंभी जिल्ह्यातील १६ गावांमध्ये १७ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला होता. दिवसेंदिवस तहानलेल्या गावांच्या संख्येत भर पडली. त्यानूसार मराठवाड्यात टँकरच्या संख्येतही प्रशासनाला वाढ करावी लागली. मार्च अखेरच्या अहवालानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ९३ गावे व १२ वाड्यांना १३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. फुलंब्रीतील १ गावात २ टँकर सुरू आहेत. यासह पैठण तालुक्यातील ११ गावांना ११ टँकरद्वारे, वैजापूर तालुक्यातील १५ गावे व १ वाडीला १६, तर गंगापूर तालुक्यातील तहानलेल्या ७ गावांना १० टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. या प्रमाणे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ९३ गावे व १२ वाड्यांना १३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून टँकरच्या मंजूर फेऱ्यांची संख्या १२१ एवढी असल्याचे विभागीय आयुक्तालयाच्या सूत्रांनी सांगितले,



**मराठवाडा वार्तापत्र**

**अभयकुमार दांडगे**

तर मराठवाड्यात २०६ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ७८, जालना ४२, हिंगोली ४४, नांदेड ३६, बीड ३, लातूर १ आणि धाराशिव जिल्ह्यात २ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यात टँकरसाठी ७५ गावांतील ९२ विहिरींचे, तर टँकर व्यतिरिक्त १०४ गावांतील ११४ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील एका गावाला तसेच माहूर येथील एका गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तसेच जालना जिल्ह्यातील २४ गावे व ७ वाड्यांना मिळून ४७ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. जालना तालुक्यातील तहानलेली गावे व वाड्यांना गरजेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. बदनापूर तालुक्यातील १२ गावे व ६ वाड्यांना १८, अंबड तालुक्यातील ८ गावांना १३ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता प्रशासनाने विहीरींचे अधिग्रहण करण्यावर भर दिला आहे.

बीड शहरात सध्या तिव्र पाणीटंचाई आहे. माजलगाव बॅकवॉटर योजनेचे पाणी बीड शहराला १५ ते २० दिवसाला सोडले जात आहे. यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक नागरिक दुचाकी तसेच चारचाकी वाहनातून पाणी आणत आहेत. नागरिकांना पाणीटंचाईमुळे खासगी टँकर चालकांकडून पाणी विकत घ्यावे लागत आहे. २५० ते १ हजार लिटर पाणी टँकरद्वारे घरपोच पोहोचविले जात आहे.

यासाठी नागरिकांना अतिरिक्त पैसे देखील मोजावे लागत आहेत. बीड जिल्ह्यात गतवर्षी वार्षिक सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस झाल्याने त्याचा फटका उन्हाळ्यात जाणवू लागला आहे. बीड जिल्ह्यातील गोदावरी आणि कृष्णा खोऱ्याअंतर्गत असलेल्या १४३ प्रकल्पांपैकी काही लघू प्रकल्प पूर्णपणे कोरडे पडले आहेत. मध्यम व लघूप्रकल्पांचा पाणीसाठा बाष्पीभवनामुळे आटून गेला आहे. बीड जिल्ह्यातील धरणात केवळ २३ टक्के जिवंत पाणीसाठा शिल्लक आहे. येणाऱ्या तीन महिन्यांत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात टँकरची गरज भासणार आहे. बीड नगरपालिका येत्या काही दिवसांत १५ दिवसांनंतरच पाणीपुरवठा करू शकेल, अशी परिस्थिती सध्या दिसून येत आहे. लातूर जिल्ह्यातील राणी सावरगाव या ठिकाणी ५ कि.मी. अंतरावरून नागरिकांना पाणी आणावे लागत आहे. तेथील जलकुंभ निकामी असून गेल्या ८ वर्षांपासून पाण्याचा एकही थेंब तेथून मिळालेला नाही. विद्युत मोटार बंद अवस्थेत आहे. घटेवाडीचे ग्रामस्थ दाद मागून थकले आहेत. जलजीवन मिशनअंतर्गत मराठवाड्यात सर्वत्रच कामे ठप्प असल्यामुळे पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. एकंदरीत मराठवाड्यातील काही जिल्ह्यात अजूनही टँकरची गरज भासलेली नाही, ही परिस्थिती काहीशी समाधानकारक मानली जात आहे; परंतु येणाऱ्या महिन्यांत मराठवाड्यात उष्णता वाढल्यानंतर पाणीटंचाई भीषण भासणार आहे. त्यासाठी आणखी टँकरची गरज मराठवाड्याला लागणार आहे.

# बंद घरे मोकळा श्वास घेऊ लागली

ग्रामीण भागाचा विचार करता अजूनही पुरेशा मूलभूत सोयी नसल्याने नागरिक मुलांना घेऊन शहराकडे जाऊ लागले आहेत. आपले ठीक आहे, आपण गावामध्ये कामधंदा करून कसे बसे कुटुंबाचा सांभाळ करेन ही मनाची तयारी. मात्र सध्या गावात कामधंदा सुद्धा नाही. मग उद्या मुलांचा उदरनिर्वाह कसा होणार यासाठी गावातील घर बंद करून ज्या शहरात नातेवाईक असतील त्यांच्या बरोबर जाऊन त्यांच्या जवळ काम मिळेपर्यंत राहायचे. काम मिळाल्यानंतर त्यांच्याच पुढाकाराने भाड्याच्या घरात राहून पगार बऱ्यापैकी असेल, तर एखाद्या चाळीत छोटीशी कर्ज काढून खोली घेणे. जेणे करून भाडे देण्यापेक्षा काही वर्षाने स्वतःच्या मालकीची खोली होईल. असे अनेकांनी केले आहे या गोष्टीला मी पण अपवाद नाही.

तेव्हा कामानिमित्त ग्रामीण भागातून कोणत्याही शहरात जाणे किंवा राहणे हे अलीकडच्या काळात वाढत आहे. तसेच मुलांना चांगल्या पगाराची नोकरी लागायची असेल तर केवळ मराठी येणे पुरेसे नाही, तर त्याला इंग्रजी लिहिता, वाचता व बोलता येणे गरजेचे आहे. यासाठी नागरिक मुलांच्या शिक्षणासाठी शहरात जात आहेत. तेव्हा काही वेळा दोन्ही बाजूने संसार चालविणे कठीण होऊन बसते. त्यामुळे गावी जी माणसे असतात त्यांना सुद्धा घेऊन आपल्या सोबत ठेवतात. यासाठी त्यांना गावचे घर बंद ठेवावे लागते. काही लोक शेजाऱ्याकडे घराची चावी ठेवतात आणि त्याला सांगतात, अधून मधून घराची साफसफाई कर तुला वरखर्चासाठी पाठवतो, तर काही आपल्या जवळच्या नातेवाईकाला घराची साफसफाई करायला सांगतात.

असे असले तरी बंद घर ते बंदच म्हणावे लागते. त्यासाठी घराचे दरवाजे, खिडक्या दिवसभर उघडून ठेवावे लागतात. घराची झाडलोट करावी लागते. घर शेणाने सारवून घ्यायचे आणि घरासमोर खळे करावे लागेल म्हणजे घर कसे लखलखीत दिसते. आजच्या सिमेंटच्या बंगल्यापेक्षा पाश्यांनी घर शेणांनी सारवणे, त्यावर कणे काढणे व भिंतीला गिलावा काढल्यामुळे घर देखणे दिसते. माझ्या गावात मी लहान असताना काही जण भिंतीला गिलावा काढण्यासाठी बिडवाडी गावातून माती घेऊन यायचे. कारण मातीच्या भिंती आणि घराच्या छतावर नळे किंवा कवले असल्याने घरात खेळती हवा त्यामुळे अशा घरात फॅनची गरज भासत नाही.



**रवींद्र तांबे**

माझ्या आयनल गावामध्ये दळवीकाकी आणि भोगलेकाकी माझ्या आयेच्या जीवलग मैतरणी होत्या. त्या गावी आल्यावर न विसरता दुसऱ्या दिवशी आमच्या घरी यायच्या आणि म्हणायच्या कोतवालीन बाय, काल दार उघडून घरात गेलय



मात्र घर खाऊक इला. आता जरा माणसात इला. खळा पण आता तोरसकरणीक सारख्या करून सारवून घेऊक सांगलय. ही तुला मुंबईची च्याय पावडर आणलय अशी दळवी काकी आयेक सांगायची, तर भोगले काकी पिशवीतून हळूच बिस्किटचो पुडो काढून आयेच्या हातात द्यायची. त्यावेळी मी आयेच्या पदराक धरून उभो असायचो. असे प्रत्येकाचे प्रेम आपल्या गावच्या घरावर व माणसांवर असते.

शहरातून घरी आल्यावर घरात जाण्यापूर्वी घराच्या पायरीला नतमस्तक होतात. तुला सोडून गेलय, वर्षान परत इलय, माझा चुकला माकला असात, तर क्षमा कर..! नंतर शेजारची काकी तांब्या भरून पाणी घेऊन येथली ते पाणी घटाघटा पितात आणि नंतर म्हणतात, आता जीव कसो थंड झालो. म्हणजे शहरातील आयस्क्रीमपेक्षा गावातील विहिरीच्या पाण्याला गोडवा तसा थंडावाही आहे. तेव्हा कामानिमित्ताने गेलेले चाकरमानी न विसरता एप्रिल-मे महिन्यामध्ये आपल्या गावी येतात. बंद असलेले घर स्वतः उघडतात. पंधरा ते वीस दिवस गावी राहून पुन्हा आपल्या रोजीरोटीसाठी शहरात जातात. जशी मुलांची परीक्षा संपत आहे तसे एक एक चाकरमानी आपल्या कुटुंबीयांसोबत गावी येत आहेत. तेव्हा वर्षभर बंद असणारी घरे आता मोकळा श्वास घेऊ लागली आहेत. काही जरी झाले तरी पंधरा दिवस सोडा दोन दिवस का असेना आपल्या गावी घरदार साफ करून चाकरमानी जात असतात.

आता मात्र चाकरमानी गावी आल्याने वस्तीतली रहदारी वाढली आहे. वाडीतल्या पायवाटांची सुद्धा चाकरमान्यांनी साफसफाई केली आहे. बंद घरे जरी आता मोकळा श्वास घेऊ लागली असली तरी रात्रीची अंधारात असणारी घरे प्रकाशमान दिसत आहेत. घराच्या परिसरात पातेरा साचलेला होता तो वाफ्यात नेऊन टाकल्यामुळे घराच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ दिसत आहे.

अशा मोकळ्या जागी संध्याकाळच्या वेळी वाडीतील व चाकरमानी मंडळी चटईवर बसून गप्पागोष्टी करीत आहेत. त्यात कोणाचे आंबे पिकले, कोणाचे फणस लागले, कोणाच्या पोराचा लगीन ठरला अशा चौकशा रंगू लागल्या आहेत. त्यात उद्या कोणत्या बाजाराला जायचे. कोकणात चाकरमानी गावी आल्यावर बाजाराला जाताना घरातील व वाडीतील मुलांना बाजाराला घेऊन जाणार हे मात्र नक्की. इतका प्रेमी कोकणातील चाकरमानी असतात. कोण बाजारात भेटल्यास भजी आणि चहा त्याला न चुकता देणार. कोण आजारी पडल्यास दोनशे रुपयांची नोट द्यायला मागे येणार नाही. तितकीच काळजी आपल्या बंद घराची गावी असेपर्यंत घेत असतात. तेव्हा कितीही काहीही झाले तरी न चुकता चाकरमानी एप्रिल-मे महिन्यामध्ये आपल्या गावी येतात. तेव्हा वर्षभर बंद असणाऱ्या घराची दारे, खिडक्या उघडल्यामुळे व साफसफाई केल्याने आता बंद घरे मोकळा श्वास घेऊ लागली आहेत.

## राशिभविष्य

शनिवार, २६ एप्रिल २०२५

### ।। पंचांग ।।

आज मिती चैत्र कृष्ण त्रयोदशी ८.३० पर्यंत नंतर चतुर्दशी शके १९४७. चंद्र नक्षत्र उत्तराभाद्रपदा ६.२७ नंतर रेवती. योग वैधृती ८.४० पर्यंत नंतर विष्कंभ . चंद्र राशी मीन. भारतीय सौर ६ वैशाख शके १९४७. शनिवार दिनांक २६ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.१३ मुंबईचा चंद्रोदय ५.३० उद्याची, मुंबईचा सूर्यास्त ६.५९ मुंबईचा चंद्रास्त ५.३३ राहू काळ ९.२५ ते ११.००, शिवरात्री, श्री अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथी, संत गोरोबाकाका पुण्यतिथी, अमावास्या प्रारंभ-उत्तर रात्री-४.५०.

### ।। भविष्य ।।

**मेष** : आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील.

**वृषभ** : कामे मनाप्रमाणे पार पडतील.

**मिथुन** : सावधानतेने राहणे गरजेचे ठरेल.

**कर्क** : प्रतिकूलतेवर मात करून पुढे जावे लागेल.

**सिंह** : आपली मते इतरांवर लादू नका.

**कन्या** : गैरसमज होऊ शकतात.

**तूळ** : व्यवहारात मैत्री यापासून अलिप्त राहा.

**वृश्चिक** : आरोग्याच्या तक्रारी वाढू शकतात.

**धनू** : नवीन कामांची आखणी कराल.

**मकर** : अति विश्वास ठेवणे घातक ठरू शकते.

**कुंभ** : आर्थिक लोभाच्या मोहाला बळी पडू नका.

**मीन** : आपल्या क्षमतेनुसार जबाबदारी स्वीकारा.

## 'अक्षय्य तृतीया'चे महत्व

वैशाख शुक्ल पक्षाच्या तिसऱ्या दिवशी अक्षय्य तृतीया हा सण साजरा केला जातो. अक्षय्य तृतीयेचा दिवस हा त्रेतायुगाचा प्रारंभ दिवस मानला जातो. या दिवशी केलेल्या शुभकर्माचे शाश्वत असे फळ मिळते. 'न क्षय इति अक्षय' म्हणजे ज्याचा कधीही क्षय होत नाही तो अक्षय होय. या दिवशी केलेली उपासना, दान हे सर्व अक्षय्य होते. महर्षी वेदव्यास यांनी अक्षय्य तृतीयेच्या दिवसापासूनच महाभारत हा ग्रंथ लिहायला सुरुवात केली. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी माता गंगा स्वर्गातून पृथ्वीवर अवतरली. अक्षय्य तृतीया हा दिवस माता अन्नपूर्णेचा अवतरण दिवस मानला जातो.

– **भीमराव साळुंखे,** सातारा

## हा भ्रष्टाचार नाही का ?

राज्य सरकार अहिल्यानगरमध्ये तीन तासांच्या मंत्रिमंडळ बैठकीसाठी 'दीडशे कोटींचा' शाही खर्च करणार आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त चौंडी येथे होणाऱ्या तीन तासांच्या मंत्रिमंडळ बैठकीसाठी १५० कोटींचा तात्पुरता खर्च प्रस्तावित आहे. जनतेचा पैसा कसा आणि कोठे खर्च करण्याच्या अधिकारावर कोणाचे नियंत्रण आहे का? मंत्रिमंडळाची बैठक जवळच्या शहरात घेऊन बैठकीवर होणारे दीडशे कोटी चौंडी गावाच्या विकासासाठी वापरावे. मंत्रिमंडळाच्या केवळ तीन तासांच्या बैठकीसाठी तात्पुरत्या सुविधा उभारण्यासाठी करण्यात येणारा हा अनावश्यक खर्च तातडीने थांबवावा. लोकसभा निवडणुकीच्या वेळी पंतप्रधानांच्या चौंडीतील सभेसाठी केवळ १२ लाख रुपये खर्च झाले. मंत्रिमंडळाच्या केवळ तीन तासांच्या बैठकीसाठी होणारा दीडशे कोटीचा खर्च हा भ्रष्टाचार नाही का? आपल्याला राज्याचा विकास साधायचा असल्यास शाही खर्च बंद करून मंत्रिमंडळाच्या बैठकी ऑनलाईन कराव्यात. मंत्रिमंडळाने असा ठराव करून भ्रष्टचार रोखावा.

– **विवेक तवटे,** कळवा, ठाणे

## ... त्यांना ओलीस ठेवावे!

पहलगाम येथे झालेला दहशतवादी हल्ला हा पाकपुरस्कृत असल्याने भारताने सध्या तातडीची प्रतिक्रियात्मक कारवाई म्हणून सिंधू पाणीकरार, अटारी चेकपोस्ट, नवी दिल्लीतील पाकिस्तान दूतावासातील कर्मचारीसंख्या कमी करणे, इत्यादी संबंधित कारवाईबरोबरच 'भारतात उपस्थित असलेल्या कोणत्याही पाकिस्तानी व्यक्तीला ४८ तासांच्या आत हा देश सोडावा लागेल; त्याचप्रमाणे दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयात उपस्थित असलेल्या लष्कर, नौदल आणि हवाई सल्लागारांना एक आठवड्यात भारत सोडून जावे लागेल', असे आदेश दिले आहेत. तसेच, केंद्र सरकारने वैध कागदपत्रांवर पाकिस्तानला गेलेल्या भारतीयांना परतण्यासाठी १ मे २०२५ पर्यंत मुदत दिली आहे आणि इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयातील अधिकाऱ्यांना परत बोलाविले आहे. तेव्हा या नंतरच्या दोन प्रकारांतील सर्व भारतीय जोपर्यंत भारतात सुखरूप परत येत नाहीत, तोपर्यंत उपरोल्लेखित पाकिस्तानी व्यक्ती/सल्लागारांना ४८ तासांच्या आत/ एक आठवड्यात भारत सोडून जाण्याबाबतचा आदेश सध्या स्थगित ठेवून त्यांना 'ओलीस' म्हणून ठेवून घेण्यात यावे. कारण पाकिस्तानची संस्कृती, सभ्यता(?), पूर्वेतिहास इत्यादी विचारात घेता पाकिस्तानची विश्वासार्हता केवळ शून्यच नव्हे, तर शून्याच्याही खाली आहे. भारतीय विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांच्या बाबतीत भारताने तो अनुभव घेतला आहे. ...१९७१ च्या बांगलादेश युद्धाच्या वेळी भारताच्या पराक्रमी सैनिकांनी तत्कालीन पूर्व पाकिस्तानात ९३,००० पाकिस्तानी सैनिक युद्धकैदी म्हणून पकडून भारतात आणले, मात्र योग्य बार्गेनिंग न करता त्यांची परतपाठवणी केली गेली. तशी चूक भारताने पुन्हा करू नये.

– **अविनाश वाघ,** पुणे

## अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने.

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर शुभ कार्य आणि दानधर्म करण्याबरोबरच इतरांसाठी तर्पण आणि पिंड दान करण्याचेही महत्त्व आहे. या दिवशी पितरांसाठी मातीचे भांडे म्हणजे घट याचे दान करावे. उन्हाळ्यात पाण्याने भरलेला घट दान केल्यास इतरांना शीतलता मिळते आणि त्यांचे आशीर्वाद देखील आपल्याला मिळतात. त्याचप्रमाणे या दिवशी भगवान विष्णूची चंदनाने पूजा करण्यास विशेष महत्त्व आहे. अक्षय तृतीयेच्या दिवशी शुचिर्भूत होऊन भगवान विष्णूची पूजा करावी. अक्षय्य तृतीयेचा दिवस माफीचा दिवस म्हणूनही मानला जातो. त्या दिवशी जर एखाद्या व्यक्तीने आपल्या किंवा आपल्या प्रियजनांकडून कळत नकळत झालेल्या चुकांसाठी माफी मागितली, तर त्याच्या सर्व चुका माफ होतात आणि त्याला देवतांकडून आशीर्वाद मिळतो असे मानले जाते.

– **शंकर पवार,** सातारा.

## एफटीआयआय गौरवशाली विद्यापीठ !

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने पुण्यातील फिल्म अॅण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाला (एफटीआयआय) अभिमत विद्यापीठाचा दर्जा देऊन तेथील कलात्मक शिक्षणाचा गौरव केला आहे. शिक्षण संस्थेच्या माध्यमातून हिंदी तसेच मराठी चित्रपट सृष्टीला नामवंत कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ दिले आहेत. गेल्या वर्षी संस्थेतील चिदानंद नाईक याने दिग्दर्शित केलेल्या 'सनफ्लॉवर्स वेअर द फर्स्ट वन्स टू नो' या लघुपटाला फ्रान्समधील मानाच्या ७७ व्या कान्स चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट लघुपटाचा 'ला सिनेफ' पुरस्कार मिळाल्यामुळे भारतीयसाठी अभिमानास्पद आणि कौतुकास्पद कामगिरी केली आहे. जगभरातील ५५५ चित्रपट संस्थांनी सादर केलेल्या एकूण २ हजार २६३ चित्रपटांमधून निवडलेल्या १८ लघुपटांमधून या लघुपटाने बाजी मारली. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा भाग म्हणून हा लघुपट तयार केला आहे. तोच कान्स चित्रपट महोत्सवात निवडला जाण्याची आणि पुरस्कार मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे. अभिमत विद्यापीठाचा दर्जा एफटीआयआयच्या गौरवशाली प्रवासातील मैलाचा दगड आहे. एफटीआयआयला जागतिक दर्जाचे विद्यापीठ करण्यासाठी विशिष्ट श्रेणीतील ही मान्यता महत्त्वाची आहे.

– **संतोष राऊत,** लोणंद, सातारा



# आहे वजनदार पण दिसते हलके...!

स्त्रियांना लेखन स्वातंत्र्य आहे का? ती बोल्ड लिहू शकते का? ती मनात येणाऱ्या सर्वच भावना सहजपणे लिहू शकते का? या सर्व प्रश्नांना माझे एकच उत्तर आहे "हो...का नाही?" पण ती लिहीत नाही हे सत्य आहे. चौकटी, मर्यादा, समाजाचे दडपण कोणत्याही प्रकारे तिच्या लेखनासाठी बंधनकारक आहेत असे मला वाटतच नाही. स्त्रियांचे लेखन संकुचित असायला कारण स्त्री स्वतःच आहे. कारण बऱ्याच वेळा ती स्वतःच उंबरठे ओलांडायला, चौकटी मोडायला, व्यक्त व्हायला, स्वतःच्या जीवनावर मोकळेपणाने भाष्य



करायला तयारच नसते. परिणामी संसार, मुलंबाळं, कौटुंबिक नाती, सासू-सुना, नातवंड, नवरा, जावई, सासरे, माहेर, अंगण याच्या पलीकडे स्त्री लेखन वाचायला मिळतच नाही. तिचं लेखन तिच्यापुरते, तिच्या विश्वापुरतच मर्यादित असलेले अनुभवायला येते. फारफार तर नोकरी करणारी एखादी स्त्री लेखिका असेल, तर थोडा वेगळा विषय ती हाताळताना जाणवते; परंतु तो विषय हाताळतानाही तिची मुळातली संसारिक सूत्रं वेगळी झालेली जाणवत नाहीत. हे माझं मत नसून जागतिक साहित्य कला व्यक्तित्व विकास मंचच्या सदस्या ज्येष्ठ लेखिका कवयित्री राधिका भांडारकर यांनी नुकतंच व्यक्त केलंय.



भालचंद्र कुबल

पाचवा वेद

कविता महाजन, मेघना पेठे, गौरी देशपांडे यांनी स्त्रियांचेच प्रश्न अतिशय धैर्याने आणि मुक्तपणे हाताळलेत. काही ना त्यांचे लेखन फार आवडले, तर काहींनी नाके मुरडली मात्र वेगवेगळ्या अभिरूचीचे, जडणघडणीचे वाचक आणि नाटकांना प्रेक्षक हे असणारच पण लेखकाने (स्त्री अथवा पुरुष कुणीही) समाजाचा आरसा बनून वास्तवतेचे दर्शन(सुंदर ते ओंगळ) मुक्तपणे घडवून देऊ नये असा अर्थ होऊ शकत नाही. सखाराम बाईंडर, पुरुष, गिधाडे, बॅरिस्टर या गाजलेल्या नाटकांसारखी, ज्वलंत तडफडणारे विषय असलेली निर्मिती एखादी स्त्री लेखिका करू शकेल का? वास्तविक या टोकाच्या बोल्ड लेखनातही स्त्रियांच्या समस्या आहेत, पण त्या पुरुष मनाच्या दृष्टिकोनातून मांडलेल्या आहेत, म्हणजेच इथे महत्त्वाचा भाग येतो तो दृष्टिकोनाचा. स्त्री लेखिका स्वतःचे दृष्टिकोन विस्तारित का करू शकत नाही? तस्लीमा नसरीन, इस्मत चुगताई, मन्नु भंडारी, कमला दास अरुंधती रॉय सारख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच लेखिका. समाजाचा प्रचंड विरोध आणि मानहानीला सामोरे जाऊनही त्यांनी लिहिलं. ते चांगलं वाईट याची मीमांसा न करता मुक्तपणे त्यांनी लिहिले आणि समाजाची एक बाजू उघडी करण्याचे धाडस दाखवले यात गैर काय ?

अगदी अलीकडच्या म्हणजे गेल्या १०-१५ वर्षांतील मराठी नाटककार लेखिकांचा विचार करता इरावती कर्णिक, कल्याणी पाठारे, स्वरा मोकाशी, मनस्विनी लता रवींद्र, डॉ. स्मिता दातार, कल्पिता राणे, कविता मोरवणकर, वर्षा दांदळे आणि त्यांच्याच पंक्तित संपदा जोगळेकर यांचा विचार करावाच लागतो. पैकी संपदा जोगळेकरांनी लिहिलेल्या व रंगभूमीवर नुकत्याच प्रदर्शित झालेल्या "वजनदार" या नाटकाबाबत आज निरीक्षण मांडणार आहे.

राधिका भांडारकर म्हणतात त्याप्रमाणे स्त्री लेखिकांना मांडायच्या प्रश्नांची इंटेन्सिटी जरी तीव्र असली तरी ती खोल मांडली जाईलच असे नाही. बऱ्याचदा ती सर्व समावेशक असेल; परंतु एक सूत्री असेलच असे नाही. कथाबीज इंटरेस्टींग असले तरी सादरीकरण हूक करणारे असेलच असे सांगता येत नाही.

अशा एक नाही, तर अनेक विस्कळीत लेखनाचे अनेक दाखले देत आपण "वजनदार" पाहू लागतो. केवळ शारीरिक स्थुलत्वाचे कारण पुढे करून एखाद्या स्त्रीच्या आयुष्यातून निघून गेल्यावर स्वतःचे वजन कमी करून परत त्याच पुरुषाला ऑब्लिगेशनमधे आणण्याचा एका महत्त्वाकांक्षी स्त्रीने केलेला प्रवास म्हणजे वजनदार नाटक होय. हे नाटक वाईट नाही; परंतु चांगले तरी कसे म्हणावे? अलका कुबल-आठल्ये यांनी प्रदीर्घ काळानंतर अभिनित केलेला विनोदी सहजाभिनयाचा परीपाठ पाहताना त्यांची व्याप्ती (रेंज) कळून येतेच याबाबत दुमत नाही. मी बऱ्याचदा नाटकाचा पहिला प्रयोग पाहत नाही कारण त्यात सफाई आलेली असेलच असे नाही, कालांतराने व सातत्याने केलेल्या प्रयोगाच्या निमित्ताने त्यात व्यावसायिक सफाई येत जाते असे माझे भाबडे मत आहे. त्यामुळे एक भीती अशीही होती की, अलकाताई उत्तम शॉट किंवा उत्तम एक्स्प्रेशन पहिल्याच शॉटमधे देतीलच असे नाही. त्यासाठी त्या दुसरा किंवा तिसरा टेक घेतील पण मग नाटकात तर फक्त एकच टेक, तो देखिल उत्तम द्यायला अंगवळणी पडणे गरजेचे असते, त्यासाठी रिहर्सल्स, प्रयोगातील सातत्य हाच एक उपाय राहतो. स्केड्युल पाचवीला पूजलेल्या सध्याच्या जमान्यात अलकाताईंसारखे कलाकार नाटकासाठी वेळ देतात, हे नाटकाप्रती योगदान नोंद घेण्याजोगेच आहे. तरीही संपूर्ण नाटक ज्या एनर्जीने प्रेक्षकांपर्यंत पोहोचायला हवे ते पोहोचत नाही. म्हणूनच सकारात्मक भाष्यकारांनी नाटक मुरले की चाखावे. वजनदार या नावावरून आणि एकंदर जाहिरातीवरून हे नाटक धमाल विनोदी असावे असा समज होतो; परंतु ते मिश्र भाव-भावनांचे रसायन आहे. अभिषेक देशमुख, साक्षी पाटील, अभय जोशी व पूनम सरोदे यांची अलकाताईंना मिळालेली साथ ॲनर्जीयुक्त होती; परंतु पुढे पुढे जसजशा अलकाताईंच्या अभिनयाचा ग्राफ चढत जाईल तेंव्हामात्र या चौघांचाही कस लागेल यात शंका नाही. नेपथ्य छान आहे; परंतु दोन गडद रंगांच कॉम्बिनेशन लो फिलिंग आणतं,



तेच रंग जर व्हायब्रंट असते तर? (हा केवळ एका शक्याशक्यतेचा प्रश्न आहे.) प्रकाशयोजनेतही सफाई येईल कारण अमोघ फडके आणि नेपथ्यकार तुषार गावकर हे अतिशय क्रिएटिव्ह रंगकर्मी म्हणून ओळखले जातात. बाकी आवर्जून उल्लेख करावा असे नाटकाचे तांत्रिक अंग म्हणजे संगीत. ब्लॅकआऊटमधे प्रसंगानुरुप मुड चेंजिंगचा प्रयोग संगीताच्या सहाय्याने करण्याचा मंदार देशपांडे यांचा एक्सपेरिमेंट झकास जमून आलाय. शिवाय "बाजूबंद" या गीताची चाल आणि संगीत अत्यंत श्रवणीय आहे. संतोष वेरुळकर या नवदिग्दर्शकाने मात्र कोविड पश्चात आधुनिक व्यावसायिकता शिकण्याची गरज आणि आवश्यकता आहे. फार काही नाही त्या विजय केंकरे आणि संतोष पवार यांची तीन तीन नाटके दोन दोन वेळा पाहिल्यास हा शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण होऊ शकतो.

एकंदरीत नाटक आहे वजनदार पण ते हलके वाटू नये याची खबरदारी निर्मात्यांना घ्यावी लागेल अगदी "वजनदार"चा लोगो बदलण्यापासून...!

# मादाम मारी क्युरीचे चरित्र

माधुरी काळे लिखित 'मादाम क्युरी' या पुस्तकाने मी पुरती भारावले होते. यावर एखादा प्रेरणादायक कार्यक्रम करावा आणि हे चरित्र सर्वांपर्यंत पोहोचवावे या विचाराने मी मारी क्युरीच्या आयुष्यातील घटनांचे फोटो जमवू लागले. माझी मैत्रीण वैशाली मेहेत्रे हिनेही इंटरनेटवरून फोटो शोधले आणि त्याचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन करण्याची कल्पना मांडली. कथाकथनासोबत तीही दाखवावी म्हणजे शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मादाम क्युरीची ओळख होईल. ते साल होते २०१०. वैशालीने पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन बनवले. त्याला हेमंत साने यांनी पार्श्वसंगीतही दिले. मारी क्युरीच्या आयुष्यातील निवडक प्रसंग लक्षात घेऊन मी कथानक लिहून काढले. आमचा तास-सव्वातासाचा कार्यक्रम तयार झाला. प्रयोग तयार झाल्यावर शाळा कॉलेजांना हा कार्यक्रम त्यांनी ठेवण्यासाठी मी भेटू लागले.

'आम्ही मादाम क्युरी'च्या चरित्रावर एक ऑडिओ व्हिजुअल कार्यक्रम तयार केला आहे. आपल्या विद्यार्थ्यांसाठी तो ठेवाल का?' यावर एका शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणाल्या, 'तुम्ही परदेशी बाईवर का कार्यक्रम केलाय? आपल्या देशात कितीतरी थोर स्त्रिया होऊन गेल्या.' मग त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील काही स्त्रियांची नावे सांगितली. त्यांच्यावर कार्यक्रम करावा असे सुचवले. यावर मी काय उत्तर देणार? एवढेसे तोंड करून मी घरी आले.


खरं तर मादाम क्युरी ही भारतीय आहे की परदेशी आहे हा प्रश्नच उद्‌भवत नाही. तिने रेडियमचा शोध लावला. त्यामुळे रेडिओॲक्टिव्हिटी ही विज्ञानाची एक नवीन शाखा निर्माण झाली. एक प्रकारच्या कर्करोगावर उपाय मिळाला. त्यामुळे जगावरच उपकार झाले. तिचे चरित्र विद्यार्थ्यांना सांगण्याजोगे आहे.



फिरता फिरता

मेघना साने

मारी क्युरी म्हणजे पूर्वीची मारी स्लोडोव्हस्का. ती पोलंडमधील अत्यंत गरीब कुटुंबातील मुलगी होती. झारच्या सत्तेमुळे मुलींना पोलंडमध्ये उच्च शिक्षण घेण्यास परवानगी नव्हती. मारीने घरापासून दूर अशा गावी पाच वर्षे गव्हर्नेसची नोकरी करून त्या पैशातून आपल्या मोठ्या बहिणीचे शिक्षण केले. मोठी बहीण फ्रान्समध्ये जाऊन डॉक्टर झाली. मग मारी तिच्याकडे राहायला जाऊन सॉरबॉन विद्यापीठात शिकली. हा सारा इतिहास मुलांसाठी किती प्रेरक आहे. पण मी शाळा कॉलेजमधे गेले तेव्हा बरेचदा आमच्या परीक्षा आहेत, अंतर्गत स्पर्धा आहेत, अशीच उत्तरे मिळाली. मग महिला दिनाला हा कार्यक्रम व्हावा म्हणून मी काही महिला मंडळांना फोन केले, तर महिला दिनाला त्यांच्याकडे पैठणीचा खेळ, कविसंमेलने,





फॅन्सी ड्रेस स्पर्धा, पाककला स्पर्धा असे कार्यक्रम आयोजित केल्याचे कळले. क्वचित काही ठिकाणी महिला पोलीस अधिकारी, महिला कलेक्टर अशा स्त्रियांचे सन्मान होत होते. ही चांगली गोष्ट होत होती. सर्वसामान्य गृहिणींना मादाम क्युरीचे चरित्र सांगण्यास मी अतिशय उत्सुक होते. मारी क्युरी ही एकमेव अशी स्त्री वैज्ञानिक आहे जिला दोन नोबेल पारितोषिके मिळाली आहेत. मारी आणि तिचे पती पीएरे यांनी मिळून संशोधन करून भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळवले होते. त्यानंतर काही वर्षांत पीएरे क्युरी यांचे अपघाती निधन झाले. त्यानंतर मात्र मारी क्यूरीने एकटीने अजून संशोधन करून रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळवले. त्याहीपेक्षा नवल म्हणजे पहिल्या महायुद्धात तिने सीमेवर जाऊन सैनिकांची सेवा केली. त्यासाठी नर्सिंगचा कोर्स केला. हे सर्व महिलांना कळायलाच हवे. पण एकाही महिला मंडळाने हा कार्यक्रम ठेवला नाही किंवा त्याबद्दल उत्सुकताही दर्शविली नाही.

मग कोणीच कार्यक्रम ठेवेना, म्हणून मी स्वतःच रवींद्र नाट्यमंदिर भाड्याने घेऊन हा प्रयोग ठेवला. या प्रयोगाला नरेंद्र बेडेकरांचे मोलाचे साहाय्य मिळाले. या निमित्ताने मी रिमोट वापरून प्रेझेंटेशनच्या स्लाईड्स पुढे सरकवायला शिकले. हा पहिला प्रयोग मी रसिकांसाठी विनामूल्य ठेवला होता. या प्रयोगाला पाहुणे म्हणून नाटककार अशोक पाटोळे, लेखक अनंत भावे उपस्थित होते. कार्यक्रमानंतर स्टेजवर प्रतिक्रिया देताना अशोक पाटोळे म्हणाले, "मादाम क्युरीवर ऑडिओ व्हिजुअल शोपेक्षा नाटक करायला हवे होते. मारी क्युरी व पीएरे क्युरी यांचे कोणत्यातरी मुद्द्यावरून पटत नाही. त्यांच्या संवादातून संघर्ष निर्माण होतो असे दाखवायला हवे होते. म्हणजे तो प्रयोग जास्त इंटरेस्टिंग ठरला असता." मला ती प्रतिक्रिया ऐकून आश्चर्यच वाटले. या कार्यक्रमाची जाहिरात पाहून 'सह्याद्री' दूरदर्शनचे युनिट अचानक माझा बाईट घेण्यासाठी आले. त्यांनी थोडेफार रेकॉर्डिंगही केले. ते बातम्यांमध्ये दाखवले की नाही ते कळले नाही. पण माझा हुरूप वाढला. आपण तयार केलेला कार्यक्रम महत्त्वाचा आहे हे मला कळले.

दरवर्षी मी या कार्यक्रमाची जाहिरात देत गेले. ठाणे येथील न्यू इंग्लिश स्कूल, कल्याणमधील टिळक हायस्कूल, ठाणे महापालिकेची शाळा येथे नववी दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम ठेवला गेला. त्यानंतर काही वर्षांनी सायन्स डे ला ठाण्याच्या बेडेकर कॉलेजमधे तसेच नारी डे ला सोमैय्या कॉलेजमधे व वसंतदादा पाटील इंजिनियरिंग कॉलेजच्या ललित कला विभागात ठेवला गेला. शाळा कॉलेजला कार्यक्रम करण्याकरिता मी कुठेही पैशांची मागणी केली नव्हती. पण अजून मी महिला मंडळांपर्यंत पोहोचू शकले नव्हते. मध्यंतरी कोरोनाची दोन वर्षे गेली. मग २०२२ पासून पुन्हा आमचे कार्यक्रम सुरू झाले. आता काळ थोडा बदलला आहे. वैचारिक कार्यक्रमाकडे लोक वळू लागले आहेत. नुकताच हा कार्यक्रम 'सिनिअर सिटिझन्स क्लब, ठाणे नॉर्थ' ने आयोजित केला होता व तो अत्यंत यशस्वी झाला. मादाम क्युरीच्या चरित्राचा लोकांच्या मनावर खूपच परिणाम झाला. या कार्यक्रमासाठी अनेक संस्थांचे फोन येऊ लागले. अगदी महिला मंडळांचेसुद्धा.

मारी क्युरीच्या चरित्रावरून स्फूर्ती घेऊन घरातल्या अडचणींची पर्वा न करता अधिकाधिक महिला संशोधनाकडे वळतील असे स्वप्न मी पाहत आहे.

meghanasane@gmail.com

# कोणतेही माध्यम वर्ज्य नाही



उमेश जगताप

उमेश जगतापनी आपल्या अभिनयाच्या जोरावर मनोरंजनाच्या या क्षेत्रात आपले पाय घट्ट रोवले आहेत. ते नाटक, मालिका, चित्रपटातून काम करीत आहे. आपण फक्त काम करण्यासाठी आलो आहोत, त्यामुळे कोणतेही माध्यम असले तरी त्यांना फरक पडत नाही. सूर्याची पिल्ले हे त्यांचे नाटक सध्या सुरू आहे.



धाराशिव तालुक्यातील आंबी गावातील अंबिका विद्यालयामध्ये त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. नंतर सावड गावातील शाळेत त्यांचे शिक्षण झाले. क्रिकेट त्यांना खेळायला आवडायचे. नंतर सोलापूरच्या हरिभाई देवकरण कॉलेजमध्ये त्यांनी सायन्सला प्रवेश घेतला. त्यानंतर तुळजापूरला येऊन त्यांनी बारावी केली. त्यानंतर बी. ए . केले. पुढे पुण्यात ललित कला केंद्रमधून नाटकातून त्यांनी एम.ए. केले. तुळजापूरमध्ये पंचरंग प्रतिष्ठानतर्फे होणाऱ्या नाटकांमध्ये त्यांनी काम केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे आयोजित युवक महोत्सवामध्ये असणाऱ्या एकांकिकेमध्ये त्यांनी भाग घेतला. मुंबईत आल्यावर आविष्कार नाट्यसंस्थेत त्यांनी नाटकात कामे केली. मिड समर नाईट ड्रीम या नाटकाचे त्यांनी जगभरात चारशे प्रयोग केले. त्यानंतर त्यांनी आविष्कार नाट्यसंस्थेची अनेक नाटके केली. हिंदीत काही नाटके केली. त्यानंतर त्यांनी श्वास चित्रपट केला. क्राइम पेट्रोल नावाची मालिका केली. रक्तचरित्र हा रामगोपाल वर्माचा चित्रपट केला. कार्यग्रह, ग्रहण, का रे दुरावा, तुझं माझं ब्रेक अप, तुला पाहते रे या मालिका त्यांनी केल्या. चला हवा येऊ द्या मध्ये त्यांनी काम केले. सेलिब्रिटी पॅटर्नमध्ये त्यांनी काम केले.त्या ला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद लाभला. त्यानंतर एकाच वर्षात त्यांना दोन वेगवेगळ्या चित्रपटातील वेगवेगळ्या भूमिकेसाठी (विनोदी व खलनायकी) पारितोषिक मिळाले.



टर्निंग पॉइंट

युवराज अवसरमल

मुक्ता बर्वे सोबत कोड मंत्र नाटक केलं. सुबोध भावे सोबत अश्रूंची झाली फुले हे नाटक त्यांनी केलं. विनोद दोषी नावाची फेलोशिप मिळाली. दिग्दर्शिका सई परांजपे सोबत एक व्यावसायिक नाटकात त्यांनी काम केले. हीच तर फॅमिलीची गंमत आहे व इशारो इशारो मे या दोन नाटकात त्यांनी सागर कारंडे सोबत काम केले. सध्या सूर्याची पिल्ले हे त्यांचं नाटक सुरू आहे. नाट्यचौफुला अंतर्गत दगड आणि माती हे नाटक सुरू आहे. जवळपास दहा वर्षे त्यांनी प्रायोगिक नाटकात काम केले, काही व्यायसायिक नाटकांत काम केली. पाच ते सहा वेब सीरिज केल्या. हिंदी, मराठी, इंग्रजी चित्रपटात कामे केली.

तुळजापूरला येऊन नाटकात कामे केली,हा त्याच्या जीवनातला टर्निंग पॉइंट ठरला.त्याच्या अगोदर काहीही ठरलेले नव्हते. तुला पाहते रे मालिकेमुळे त्यांना खूप लोकप्रियता मिळाली.चला हवा येऊ द्या मधील कामाला लोकांनी पसंती दिली. ते नाटक,मालिका, चित्रपट या सर्वच माध्यमांमध्ये काम करीत आहेत. फक्त सतत काम करत राहणे हा त्याच्या जीवनाचा मंत्र आहे.



# 'खटलेबाज' नाटकाचा सस्पेन्स...

रंगभूमीवरचे 'सबकुछ व्यक्तिमत्त्व' म्हणून दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे यांची ओळख आहे. दिग्दर्शनासह निर्मिती, प्रकाशयोजना, नेपथ्य, संगीत या आणि अशा विविध प्रांतात त्यांची मुशाफिरी सुरू असते. तर असे हे व्यक्तिमत्त्व सध्या एका 'खटलेबाज' नाटकाच्या तयारीत गुंतले असल्याची चर्चा आहे. आता 'खटलेबाज नाटक' म्हणजे नक्की काय; याचा अंदाज लावण्याचे काम तूर्तास तरी त्यांनी रसिकांवर सोपवले आहे. समाजमाध्यमांवर सध्या या नाटकाविषयी होत असलेल्या चर्चांवरून, या नाटकाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढली आहे. या खटलेबाज नाटकाचे शीर्षकही अगदी खटकेबाज असल्याचे खात्रीलायकरीत्या समजते. साहजिकच, या सगळ्यामुळे या नाटकाविषयीचा सस्पेन्स वाढीस लागला असून, नाट्यसृष्टीत आता पुरुषोत्तम बेर्डे नक्की कोणत्या धाटणीचे नाटक घेऊन येणार, या विषयीची उत्कंठा ताणली गेली आहे. लवकरच या नाटकाचा शुभारंभ होणार आहे. आता या नाटकात कोणते कलाकार भूमिका साकारणार, हे काही दिवसांतच उघडकीस येणार असून, या 'खटलेबाज' नाटकाची चर्चा सध्या नाट्यकट्ट्यांवर जोरात सुरू आहे.





# 'ती' भेटणार नव्याने...

साधारण सव्वा वर्षांपूर्वी रंगभूमीवर आलेल्या आणि आश्वासक पावले टाकत असलेल्या 'अमेरिकन अल्बम' या नाटकाने त्याच्या चाकोरीबाहेरच्या विषयामुळे विशेष दखल घेण्यास भाग पाडले. या नाटकाचे ५० प्रयोग झाल्यानंतर मात्र या नाटकाचे शीर्षक बदलून 'तू भेटशी नव्याने' असे करण्यात आले. भारत आणि अमेरिका या देशांच्या पार्श्वभूमीवर फुलवण्यात आलेल्या या नाटकाची मोहिनी रसिकांना आधीच पडली आहे. पुणे स्थित 'रसिकमोहिनी' या नाट्यसंस्थेची निर्मिती असलेले हे नाटक, त्याच्या नामांतरानंतर मुंबईत येऊन थडकले आहे. येत्या २९ एप्रिल रोजी दुपारी या नाटकाचा प्रयोग दादरच्या श्री शिवाजी मंदिरात रंगणार आहे. या प्रयोगाच्या निमित्ताने, मुंबईकर रसिकांना या नाटकातली 'ती' नव्याने भेटणार आहे. या नाटकात 'ती'चे महत्त्व अनन्यसाधारण आहे. याचे कारण म्हणजे, याआधी नाटकाच्या शेवटी फक्त व्हीडिओच्या माध्यमातून दिसणारी 'ती', म्हणजेच यातली अमेरिकास्थित युवती 'हनी' हिला रंगमंचावर परत आणण्यात आले असून, नाटकाच्या शेवटी हा बदल करण्यात आला आहे. या बदलासह आणि नाटकाच्या बदललेल्या शीर्षकासह हे नाटक आता मुंबईत रंगणार आहे.



राजरंग

राज चिंचणकर

# ३५ दिवस... २५ प्रयोग...

अनेक कलाकारांनी आपल्या नावाची जादू रंगभूमीवर करून ठेवली आहे आणि त्याचा उपयोग वेळोवेळी अनेक नाट्यकृतींना होत आला आहे. असेच एक उदाहरण 'कुटुंब किर्रतन' या नाटकाच्या निमित्ताने सध्या रंगभूमीवर दिसून येत आहे. साधारण महिन्याभरापूर्वी शुभारंभ झालेल्या या नाटकाने केवळ ३५ दिवसांत २५ प्रयोग सादर करून यशस्वी घोडदौड सुरू ठेवली आहे. 'प्रशांत दामले फॅन फाऊंडेशन' व 'गौरी थिएटर्स' यांनी रंगभूमीवर आणलेल्या



या नाटकात ज्येष्ठ रंगकर्मी वंदना गुप्ते यांच्या भन्नाट भूमिकेसह, सध्याचा आघाडीचा अभिनेता संकर्षण कऱ्हाडे याची महत्त्वाची भूमिका आहे. या नाटकाचे लेखनही संकर्षणने केले असल्याने ती या नाटकाची जमेची बाजू आहे. या दोघांसह, रंगभूमीवर विविध भूमिकांद्वारे लक्ष वेधून घेणारा अभिनेता अमोल कुलकर्णी व मालिकांच्या माध्यमातून घराघरांत पोहोचलेली युवा अभिनेत्री तन्वी मुंडले यांच्या या नाटकात भूमिका आहेत. या चौघांच्या अभिनयाचा चौकोन या नाटकात बेमालूम गुंफला गेला आहे. निर्माते म्हणून प्रशांत दामले यांची भक्कम साथ, संकर्षण कऱ्हाडेच्या लेखनाची कमाल, अमेय दक्षिणदास यांची दिग्दर्शकीय पकड आणि तंत्रज्ञांची कुशल साथ; यामुळे या नाटकाने अल्पावधीतच रौप्य महोत्सवी पल्ला गाठला आहे. आता हे नाटक रंगभूमीवर त्याचा पन्नासावा प्रयोग सादर करण्याच्या तयारीत आहे.

# कालचक्र थांबवण्यासाठी २० जूनला येतोय 'समसारा'

"समसारा" च्या निमित्ताने सायली संजीव, ऋषी सक्सेना पुन्हा एकत्र अत्यंत वेगळ्या धाटणीचा, दमदार स्टारकास्ट असलेला समसारा हा चित्रपट २० जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. चित्रपटाचं अतिशय धीरगंभीर असं टीजर पोस्टर लाँच करण्यात आलं असून, 'समसारा' सध्याच्या मराठी चित्रपटसृष्टीत उल्लेखनीय चित्रपट ठरणार आहे.

संचय प्रॉडक्शन्स प्रस्तुत 'समसारा'ची निर्मिती पुष्कर योगेश गुप्ता यांनी केली असून, दिग्दर्शनाची जबाबदारी सागर लढे यांनी सांभाळली आहे. कथा सागर लढे, विश्वेश वैद्य आणि समीर मानेकर यांची असून, पटकथा सागर लढे आणि समीर मानेकर यांनी लिहिली आहे. तर समीर मानेकर, निहार भावे यांनी संवादलेखन केलं आहे. विश्वेश वैद्य यांनी संगीत, अक्षय राणे छायांकनाची जबाबदारी निभावत आहेत. सायली संजीव, ऋषी सक्सेना, पुष्कर श्रोत्री, डॉ. गिरीश ओक, नंदिता धुरी, प्रियदर्शनी इंदलकर, तनिष्का विशे, यशराज डिंबळे, कैलास वाघमारे, साक्षी गांधी अशी उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात आहे. कार्यकारी निर्माता म्हणून महेश भारंबे व अन्वय नायकोडी काम पाहणार आहेत.

'देव, दानव, असुर, मानव यांच्यातला एक पडला तरी दुसरा उभा राहतो. हे चक्र सुरू राहतं. पण हे चक्र थांबवायला काळ स्वतः जागा होतोय. आम्ही येतोय....' असे शब्द धीरगंभीर आवाजात ऐकू येतात आणि त्यातून समसारा चित्रपटाचं पोस्टर साकारलं आहे. अत्यंत कल्पक असं हे पोस्टर असून, त्यातून चित्रपटाच्या कथानकाचा नेमका अंदाज बांधता येत नाही. अतिशय सूचक अशा प्रकारचं हे पोस्टर आहे. त्यामुळे दमदार स्टारकास्ट असलेल्या





समसारा या चित्रपटाविषयी उत्सुकता प्रचंड वाढली आहे. हा चित्रपट मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी २० जूनपर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

# हजारो हेक्टरवरील पिके धोक्यात

चर्चा | पाटबंधारे विभाग अधिकाऱ्यांना गांभीर्य नाही

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी : परळी तालुक्यातील हजारो हेक्टरवरील पिके पाण्या अभावी धोक्यात सापडली आहेत. ऊस व हंगामी पिके करपू लागली आहेत. जायकवाडी मधून उजव्या कालव्यात पाणी सोडले आहे, हे पाणी थर्मलला सुरु आहे परंतु अद्याप उजव्या कालव्यातून सिंचनासाठी चाऱ्यांना पाणी सोडले नाही ,थर्मलला मात्र आठ दिवसांपासून पाणी पुरवठा केला जातो आहे . पाण्या अभावी पिके करपत असतांना, शेतकरी संकटात सापडलेला असतांनाची परिस्थिती आहे मात्र याचे संबंधित पाट बंधारे विभागाला कसलेही गांभीर्य असल्याचे दिसत नाही .काळ्या मातीच्या जमिनीवरील पिके सुकू लागली तर बरडी,मुरमाड, हलक्या जमिनीवरील पिके तर अक्षरश वाळू लागली आहेत, हि परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी चिंतेत आहे. अजून चार पाच दिवस तरी सिंचनासाठी पाणी सोडल्या जाणार नाही असे पाटबंधारे विभागाचे अधिकारी सांगत आहेत. महिणा महिणा पाणी पिकांना मिळत नसेल तर अशा उष्ण कडक उन्हाळ्यात पिके तग धरु



शकणार नाहीत, वेळेवर पाणी न मिळाल्यास सहाजिकच उत्पन्नावर परिणाम होणारा आहे . जायकवाडी च्या पाण्याच्या अपेक्षेवर शेतकऱ्यांनी खुप मोठ्या प्रमाणावर ऊस लागवड केलेली आहे. परंतु वेळेत पाणी सोडले जात नसल्याने ऊस उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे.

### पाटबंधारे विभागाच्या दारात बसणार:लक्ष्मण पौळ

पाट बंधारे विभागाचे अधिकारी जाणूनबुजून शेतकऱ्यांना सिंचनासाठी वेळेवर पाणी सोडत नाहीत, वेळेवर पाणी न मिळाल्याने ऊसउत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. पाण्या अभावी ऊस /पिके करपत आहेत, पाट बंधारे अधिकाऱ्यांना फोन करुन विचारले असता उडवा उडवीची उत्तरे देत आहेत. थर्मलला पाणी दिल्या जात आहे असे म्हणत आहेत.थर्मल च्या पाण्याला आमचा काही विरोध नाही परंतु महिणा उलटला आहे , सिंचनासाठी चा-यांना अद्याप पाणी सोडले नाही . शेतकरी चिंतेत सापडला आहे. दोन दिवसांत पाणी नाही मिळाले तर पिकांचा धुरुळा होऊन जाईल. या मुळे शेतकरी वर्ग खुप संतापला आहे . दोन दिवसात पाणी सोडले नाही तर शेतकऱ्यांना घेऊन पाट बंधारे विभागाच्या दारात बसुन अंदोलन केले जाईल असा ईशारा ऊस उत्पादक शेतकरी तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक लक्ष्मण पौळ यांनी दिला आहे .

## ...त्या फक्त पोस्ट करण्यात माहीर

बोंबला:आ.नमिता लोखंडे विरोधात सूर





पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमीता लोखंडे फक्त विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने उपस्थित राहुन विडीओ, फोटो पोस्ट करण्यासाठीच आमदार झाल्या आहेत का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे . आमदारा नमीता लोखंडे यांनी प्रसिद्धी माध्यमांच्या माध्यमातून प्रसार विडीओ, पोस्ट नक्कीच कराव्यात कारण जगात जे काही घडत ते पोस्ट केलेच पाहिजे व अधिकारी प्रत्येकालाच आहे त्यामुळे त्यांनी पोस्ट करणे काही जगावेगळे नाही परंतु आमदार नमीता लोखंडे यांचा कारभार सगळा सासरे नंदकिशोर मुंदडा यांच्या हातात आहे तसेच केज अंबाजोगाई मतदार संघाचे आमदार म्हणून सासरे नंदकिशोर मुंदडा मिरवतात तसेच कुनाची चौकशी लावायची कुनाला कीती निधी द्यायचा,कुनाची कीती टक्केवारी खायची ,कुनाच्या कार्यक्रमाला उपस्थित रहायचे कुनाच्या कार्यक्रमाला उपस्थित रहायचे नाही जवळपास सर्वच आमदारांचे अधिकारी नंदकिशोर मुंदडा यांना आहेत तसेच कुठल्याही कामाचे म्हणजे आमदारा निधीच्या कामाचे उद्घाटन आमदार सासरे नंदकिशोर पान २ वर

## विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: तालुक्यातील श्री संत बोधले महाराज प्राथमिक विद्यमंदिर डिकसळ शाळेतील दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या वर्ग ५ वी स्कॉलरशिप (शिष्यवृत्ती )परीक्षा मध्ये दहा विद्यार्थी पात्र झाले आहेत. यामध्ये अंबिरकर शुभ्रा नवनाथ - २२०, बोराडे शुभ्रा गणेश- २०६, वाघमारे सिद्धार्थ अजय - २००, भांडे ओंकार श्रीकांत -१८०, खके शिवम अशोक - १७४, वनकळस क्रांती सोनाजी - १७०, गायकवाड संध्या माणिक -१६२,शेळके आदित्य चंद्रकांत -१५२,आवटे जान्हवी महेंद्र -१४८,वाघमारे सोहम अविनाश -१३० या सर्व १० पात्र विद्यार्थी सत्कार करून पुढील यशासाठी संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत( बप्पा )टेकाळे मुख्याध्यापक , शिक्षक व पालकांनी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांना मार्गदर्शन करणारे मुख्याध्यापक निकम पोपट, शिक्षक रमेश अंबिरकर,नामदेव झाडे, प्रदिप यादव,सूरज राऊत, सज्जन बर्डे, किशोर वाघमारे,श्रीमती चैताली टेकाळे यांनी अभिनंदन केले. डिकसळ गावातील पालकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत मारली बाजी

अभिनंदनिय:गौरी कांबळेचे यश

पुण्यभूमी प्रतिनिधी



दिंद्रुड :महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे च्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवीच्या वर्गातील विद्यार्थिनी गौरी नवनाथ कांबळे हिने यश संपादन केले असून ती या शिष्यवृत्तीस पात्र झाली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की दिंद्रुड येथील अभिनव पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता पाचवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली पत्रकार नवनाथ कांबळे यांची मुलगी गौरी कांबळे हिने पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले असून या शिष्यवृत्तीसाठी पात्र झाली आहे. तिच्या या यशाबद्दल अभिनव पब्लिक स्कूलमधील सर्व शिक्षक शिक्षिका तसेच परिसरातून तिचे कौतुक होत आहे.

## शैक्षणिक धोरणाविरोधात लढा

ॲड.अमोल डोंगरे:सुरुमगाव येथे जयभिम महोत्सव

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंती निमित्त माजलगाव तालुक्यातील शेवटचे असणारे गाव सुरुम गाव येथे दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी सकाळी ९:३० वाजता निळ्या ध्वजा चे ध्वजारोहण सुरुमगावचे विद्यमान सरपंच श्री.शिवकुमार माने यांच्या हस्ते संपन्न झाले. तर कार्यक्रमाचे उद्धघाटन माजी सरपंच कल्याण गुळभिले यांनी केले.बहुजन समाज पार्टी, बीड जिल्हा प्रभारी अड.अमोल डोंगरे हे यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलत असतांना म्हणाले की; इथल्या मनुवादी व्यवस्थेने भारतीयांचा



संविधानीक असणारा मुलभूत शैक्षणिक अधिकारामध्ये बदल घडवून भारतीयांनी यापुढे शिक्षण घेवू नये यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू करण्यात येत आहे.

याव्दारे पटसंख्या कमी असलेल्या शाळा बंद करुन पुर्व प्रार्थमिक ते बारावी पर्यंतचे शिक्षण एकाच छताखाली म्हणजे स्कुल कॉम्प्लेक्स दहा-बारा गावात पंधरा ते तीस किलोमीटर अंतरावर तयार झाले तर विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणार नाही आपोआप मुलींचे शिक्षण बंद होईल.त्यामुळे पुन्हा एकदा देशाला अस्थिर करून भारतीयांना गुलाम करण्याचे सुरू असलेले षडयंत्र या देशातील नागरिकांनी हाणुन पाडण्यासाठीचा लढा माजलगाव तालुक्यापासून उभा करणार असे बहुजन समाज पार्टी चे बीड जिल्हा प्रभारी अड.अमोल डोंगरे यांनी म्हटले यावेळी या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रशांत गुळभिले, उपसरपंच नितेश खोपे, उमाकांत खोपे,विखे पाटील, पांडू राऊत पान २ वर

## केज पंचायत समितीत गोंधळ!

प्रश्न: दराडे इंजिनिअर बीडीओ का?




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:पंचायत समितीच्या सगळ्या कारभारात लुडबुड करून दराडे इंजिनिअर केज पंचायत समीतीने कामे पाहत आहे परंतु बिडीओ दिवाने मॅडम तुम्ही काय फक्त नावालाच बीडीओ आहेत का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण दराडे इंजिनिअर पंचायत समिती जनु काय त्यांची जहागीर आहे असे वागतात त्यामुळे बीडीओ दीवाने मॅडम तुम्ही गटविकासअधिकारी पद दराडेला देऊन बीडीओ दीवाने मॅडम तुम्ही गटविकासअधिकारी पदाचा राजीनामा सीईओ कडे दिला तरी काही हरकत नाही कारण दराडे इंजिनिअर पंचायत समितीचा बीडीओ आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे व तसेच छोट्या मोठ्या कामात चिरीमिरी घेऊन कामे करणाऱ्या दराडेला लाचलुचपत करुन पगार कमी पडत आहे म्हणून बीडीओ पद लाचलुचपत दराडेला देऊन टाकावे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

## शिक्षणाची दारे खुली केली

पप्पू कागदे: डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील तमाम उपेक्षीत, शोषित, पिडीत समुहातील समाज बांधवाना गुलामीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी व त्यांची सामाजिक प्रगती घडविण्यासाठी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मुलमंत्र देवून शिक्षण मोफत व सक्तीचे केले. कारण शिक्षणामुळे माणूस सज्ञान होवून समाजाची प्रगती होते.म्हणून शिक्षणामुळेच समाज बांधव विवीध क्षेत्रातील उच्च पदावर काम करीत आहेत. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती निमीत सावरगांव (चकला), मंझरी, आनंदवाडी सुर्डी थोट या गांवी केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, शिक्षणामुळे माणसे, समाज, घरे व पिढ्या



सुधारतात आजच्या काळात गुणवत्ता मिळविण्यासाठी शिक्षण महत्वाचे आहे. कारण शिक्षणामुळे नव क्रांती घडते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला महत्व देवून शिक्षण भोफत वसक्तीचे केले. परंतू पान २ वर

## परळीत गायींना दिले गुंगीचे औषध

संतप्त: पंकजा मुंडेंकडून अटकेचे आदेश

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:गायींना गुंगीचे औषध देऊन त्यांची तस्करी करण्याचा प्रयत्न काही नागरिकांच्या सतर्कतेमुळे फसल्याचा प्रकार शहरात घडल्यानंतर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकारामागे जे कोणी असतील त्यांना तात्काळ अटक करावी अशा सूचना त्यांनी पोलिस प्रशासनाला दिल्या आहेत.



शहरातील स्नेहनगर भागात काल रात्री गायींना खाण्याच्या पदार्थांमधून औषध देण्याचा संतापजनक प्रकार घडला. गायींना बेशुद्ध करून त्यांची तस्करी करण्याचा अज्ञात चोरट्यांचा प्रयत्न होता असा संशय स्थानिक रहिवाशांना आला, त्यांनी सतर्कता दाखवून हा प्रयत्न हाणून पाडला. राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना हा प्रकार समजताच त्यांनी तातडीने पोलिस अधीक्षक व स्थानिक पोलिस निरीक्षक पान २ वर

उपक्रम | यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण

## निलज्योती संस्थेकडून गुणगौरव

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:निलज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे संस्थेचे सचिव व ज्येष्ठ पत्रकार डॉ. नंदकुमार उघाडे यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या सामान्यज्ञान स्पर्धेत व्हिक्ट्री इंग्लिश स्कूल , डॉ. भिमराव पिंगळे विद्यालय , छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालय , गुरुनानक प्राथमिक विद्यालय बीड या शाळांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक डोंगरदिवे सर , मुख्याध्यापक मुंडे सर , प्रिन्सिपल गीते मॅडम , तांदळे सर , गदळे सर व डॉ. नंदकुमार उघाडे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

या सामान्यज्ञान स्पर्धेसाठी वर्गनिहाय गट पाडण्यात आले होते. प्रत्येक गटासाठी १००







प्रश्नांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नपत्रिका तयार करण्यात आली. या प्रश्नपत्रिकांमध्ये इतिहास , भूगोल , भारतीय राज्यपद्धती , समाज सुधारक , विज्ञान मराठी व्याकरण , इंग्रजी व्याकरण , गणित , बुद्धिमापन चाचणी व चालू घडामोडी या घटक विषयांसह शालेय अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांचा समावेश होता. या स्पर्धेत डॉ भीमराव पिंगळे विद्यालय बीड गट-अ मधून प्रथम क्रमांक रितेश जाधव , द्वितीय क्रमांक यश जाधव व तृतीय क्रमांक साहिल वडमारे आणि अस्मिता थोरात यांनी मिळवला. गट ब मधून प्रथम पान २ वर

## पाथर्डी शाळेत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

शैक्षणिक:शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थी पात्र



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी येथे नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचा मा.सरपंच नानासाहेब पिंगळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. अंजली जाधव, पोलीस पाटील बालाजी चिंचकर, मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, बप्पासाहेब पिंगळे, कुंडलिक पिंगळे, श्रीकांत पिंगळे, सौ. शारदा पिंगळे, सौ. धनश्री पिंगळे सौ. जनाबाई जाधव, आशाबाई रणदिवे, मार्गदर्शक शिक्षिका सरोजिनी पोते, धनंजय गव्हाणे, मनिषा पवार या सर्वांच्या शुभहस्ते यशवंत विद्यार्थिनी कु. गौरी श्रीकांत पिंगळे व कु.आदिती पान २ वर